THE

Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 20TH SEPTEMBER 1894.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

PART IX.—Marathi Acts, &c.

मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराचा बंदोबस्त ठेवण्याविषयींचे लश्करी आईन सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराचा बंदोबस्त ठेवण्याविषयींचे लश्करी आईन सुधारणें योग्य आहे; त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९४ चा हिंदुस्थानच्या लश्करी आईनांचा आक्ट असें ह्मणावें; आणि

सरनामा व सुरुवात.

(२) तो सन १८९४ च्या   महिन्याच्या पहिल्या तारखेरोजीं अमलांत येईल.

२. हिंदुस्थानचे लश्करी आईन (ज्यांस यांत पुढें "सदहू आईन" असें ह्मटलें आहे) यांच्या १ ल्या भागाची रकम (क) ही यावरून रद्द केली आहे.

हिंदुस्थानच्या लश्करी आईनांच्या १ ल्या भागाची रकम (क) रद्द करणें.

३. सदहू आईनांच्या १ ल्या भागाच्या (ड) रकमेबदल खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

१ ल्या भागाच्या (ड) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.

"(ड).—आईनांची व्याप्ति.

"हे आईन—

(अ) ज्या मनुष्यांस ते हल्लीं खरोखर लागू आहेत त्या सर्वांस;

(ब) ज्या मनुष्यांस मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराचे एतद्देशीय अमलदार ह्मणून सनद मिळालेली असेल किंवा तसे अमलदार ह्मणून किंवा वारंट अमलदार ह्मणून ज्यांचें नांव ग्याझेटांत प्रसिद्ध झालें असेल त्या सर्वांस;

(क) ताब्यांतील सर्व वैद्यकीय अमलदारांस;

(ड) या आईनांअन्वयें प्रतिज्ञा केलेल्या सर्व मनुष्यांस;

(ई) प्रतिज्ञा न केलेल्या सर्व रिक्रूटांस;

(फ) या आईनांअन्वयें पटांत नांव दाखल केलेले मनुष्य;

(ग) एऱ्हवीं लष्करी कायदा लागू नसणाऱ्या ज्या मनुष्यांस, मोहिमेच्या वेळीं, तळ दिला असेल तेव्हां, कूच करीत असतांना, किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं या बाबतींत जाहिरनामा प्रसिद्ध करून निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि सरहद्दीवरील नाक्यावर, मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्करानें नोकरीस ठेविलें असेल, किंवा जे त्या लष्कराच्या नोकरींत असतील, किंवा त्या लष्कराच्या बरोबरचें बुणगें असतील, किंवा त्या लष्कराच्या कोणत्याही भागाबरोबर असतील त्या सर्वांस;

लागू होतील असें समजावें :

मात्र असें ठरविलें आहे कीं,—

ज्या वर्गास इंग्लंड देशाचा सैन्याबाबदचा आक्ट लागू असून हे आईन लागू नसतील अशा वर्गाचा आपण आहें असा कोणताहि मनुष्य दावा सांगेल, तर त्या वर्गाचा तो आहे असें शाबीत करण्याचा बोजा त्या मनुष्यावर राहील."

१ ल्या भागाच्या (ई) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.

४. सदर्हू आईनांच्या १ ल्या भागाच्या (ई) रकमेबदल खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

"(ई) व्याख्या·

"या आईनांमध्यें, विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तरः—

(१) 'जाहीरनामा' ह्मणजे सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केलेला जाहीरनामा :

(२) 'ठरविलेलें' ह्मणजे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं अगर या बाबतींत त्यांजकडून ज्या कोणत्याहि अधिकाऱ्यास अख्त्यार देण्यांत आला असेल त्या अधिकाऱ्यांनीं केलेल्या कानूंवरून ठरविलेलें :

(३) 'ब्रिटिश अमलदार' ह्मणजे मलिका माआझमांच्या जमिनीवरील लष्करांत सनद धारण करणारा अमलदार असा अर्थ आहे, मात्र या शब्दांत ऑनररी सनदी अमलदाराचा समावेश होत नाहीं :

(४) 'एतद्देशीय अमलदार' ह्मणजे मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्करांत एतद्देशीय लोकांची कोणतीहि रांक धारण करणारा अमलदार ह्मणून ज्याला सनद मिळाली असेल किंवा ज्याचें नांव ग्याझेटांत प्रसिद्ध केलें असेल तो अमलदार :

(५) 'अमलदार' ह्मणजे ब्रिटिश अमलदार किंवा एतद्देशीय अमलदार; मात्र या शब्दांत वारंट अमलदाराचा किंवा गैरसनदी अमलदाराचा समावेश होत नाहीं:

(६) 'ताब्यांतील वैद्यकीय अमलदार' ह्मणजे सीनियर आस्पिटल असिस्टंट, पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाचा आस्पिटल असिस्टंट व सब्-आस्पिटल असिस्टंट; मात्र या शब्दांत अमलदाराचा समावेश होत नाहीं :

(७) 'वरिष्ठ अमलदार' या संज्ञेचा, उपयोग हे आईन लागू असणाऱ्या मनुष्याच्या संबंधानें केला असेल तेव्हां त्यांत वारंट अमलदाराचा, गैरसनदी अमलदाराचा व आक्टिंग गैरसनदी अमलदाराचा समावेश होतो :

(८) 'शिपाय' या शब्दांत कोणत्याहि गैरसनदी अमलदाराचा व मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्कराच्या रांकांमध्यें काम करणाऱ्या कोणत्याहि हत्यारबंद मनुष्याचा समावेश होतो :

(९) 'रिक्रूट' ह्मणजे कोणत्याहि कोराच्या किंवा डिपार्टमेंटच्या पटांत शिपाय ह्मणून नांव दाखल करण्यासाठीं नांव लिहून घेतलेला मनुष्य :

(१०) 'कोर' ह्मणजे एक कमाण्ड, जसें उदाहरणार्थ, स्वारांची एक पलटण, पायदळाची एक पलटण किंवा बटालियन, तोफखान्याची एक बॅटरी व सैन्याची जी कोणतीहि इतर निराळी तुकडी या आईनांच्या कारणांसाठीं कोर आहे असें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं साधारण किंवा विशेष हुकुम करून ठरविलें असेल ती तुकडी; यांत आर्मी आस्पिटल कोर व ट्रान्स्पोर्ट कोर यांचाहि समावेश होतो:

(११) 'डिपार्टमेंट' या शब्दांत डिपार्टमेंटच्या कोणत्याहि भागाचा किंवा शाखेचा समावेश होतो:

(१२) 'लष्करी इनाम' ह्मणजे बहुत काळपर्यंत केलेल्या नोकरीबद्दल किंवा चांगल्या वर्तणुकीबद्दल कोणतीहि ग्राचुइटी किंवा वर्षासन; यांत चांगल्या वर्तणुकीबद्दलच्या कोणत्याहि पगाराचा किंवा पेन्शनाचा व इतर कोणत्याहि द्रव्यद्वारें दिलेल्या इनामाचा समावेश होतो:

(१३) 'शत्रु' यांत सर्व हत्यारबंद दंगा करणारांचा, हत्यारबंद बंडवाल्यांचा, हत्यारबंद दंगेखोरांचा व चांच्यांचा समावेश होतो:

(१४) 'मोहीम' ही संज्ञा हे आईन लागू असणाऱ्या मनुष्यास लाविली असेल तेव्हां तिचा अर्थ ज्या वेळीं असा मनुष्य, शत्रूशीं लढाई करण्याच्या कामीं गुंतलेल्या, किंवा शत्रूंनीं सर्वांशीं किंवा अंशतः व्यापलेल्या देशांत अगर जागेंत लढाई करण्याच्या कामीं गुंतलेल्या, किंवा कोणत्याहि परमुलुखाचा लष्करी नात्यानें कबजा धारण करणाऱ्या फौजेच्या दिमतीस असेल किंवा तशा फौजेंतील एक असामी असेल ती वेळ असा आहे:

(१५) 'इंडिया [हिंदुस्थान]' या संज्ञेचा अर्थ, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या मार्फत किंवा कोणतेहि गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या मार्फत अगर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या ताब्यांतील इतर अमलदाराच्या मार्फत चालविलेल्या मलिका माआझमांच्या सार्वभौमसत्तेखालील कोणत्याहि राजाच्या किंवा संस्थानिकाच्या कोणत्याहि मुलुखांसहित ब्रिटिश इंडिया असा आहे: आणि ब्रिटिश इंडिया या संज्ञेचा अर्थ, मलिका माआझमांच्या राज्यांतील ज्या मुलुखांचें व जागांचें मलिका माआझमांकडून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे मार्फत किंवा कोणतेहि गव्हर्नर इन् कौन्सिल यांजमार्फत अगर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या ताब्यांतील इतर अमलदाराच्या मार्फत विवक्षित काळीं राज्य चालविण्यांत येत असेल ते सर्व मुलुख व त्या सर्व जागा असा आहे:

(१६) 'कमाण्डचा जनरल आफिसर' या संज्ञेचा अर्थ, कमाण्डमधील फौजेचा ताबा असणारा जनरल आफिसर असा आहे: आणि कमाण्ड या संज्ञेचा अर्थ, इंडियाच्या सैन्याचे जे मुख्य भाग विवक्षित काळीं केलेले असतील त्यांपैकीं एक भाग असा आहे:

(१७) 'कमाण्डिंग आफिसर' या शब्दांचा, मलिका माआझमांच्या फौजेच्या कोणत्याहि पृथक् भागाच्या अगर कोणत्याहि डिपार्टमेंटच्या संबंधानें या आईनांच्या कोणत्याहि ठरावांत उपयोग केला असेल तेव्हां, त्यांचा अर्थ, इंडियाच्या आर्मी रेग्युलेशनांअन्वयें, किंवा असें कोणतेंहि रेग्युलेशन नसेल तेव्हां लष्करी नोकरीच्या रिवाजावरून त्या फौजेच्या सदरहू भागाच्या अगर सदरहू डिपार्टमेंटच्या संबंधानें, त्या ठरावांत सांगितलेल्या प्रकारच्या गोष्टींच्या संबंधाचीं कमाण्डिंग आफिसराचीं कामें करणें हें ज्या अमलदाराचें कर्तव्य असेल तो अमलदार असा आहे:

(१८) 'लष्करी अटक' ह्मणजे लष्करी नोकरीच्या रिवाजाबरहुकुम एकाद्या मनुष्यास नजर कैदेंत किंवा कैदेंत ठेवणें:

(१९) 'कोर्ट-मार्शल' ह्मणजे या आईनांअन्वयें भरलेलें कोर्ट-मार्शल:

(२०) 'फौजदारी कोर्ट' ह्मणजे ब्रिटिश इंडियांत असलेलें, किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून इतर ठिकाणीं स्थापन केलेलें अगर चालू ठेवलेलें साधारण फौजदारी न्यायाचें कोर्ट:

(२१) 'सिव्हिल गुन्हा' ह्मणजे जो गुन्हा ब्रिटिश इंडियांत केला असतां त्याचा इन्साफ फौजदारी कोर्टास करतां येईल असा गुन्हा: आणि

(२२) ज्या संज्ञा हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींच्या कायद्यांत आल्या असून ज्यांचा या आईनांत उपयोग केलेला असेल त्या संज्ञांचा अर्थ त्या कायद्यांत जो केला आहे तोच आहे, असें समजावें:

१ ल्या भागाच्या (फ) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.

५. सदहू आईनांच्या १ ल्या भागाच्या (फ) रकमेच्या बदला खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"(फ).—कित्येक कायदे कायम ठेवणें.

"क्यांटोन्मेंट माजिस्ट्रेटांच्या आणि छावण्यांतील पोलीस स्वाधीन असणाऱ्या अमलदारांच्या हुद्यांची व अधिकारांची ज्या कोणत्याहि कायद्यांत व्याख्या केली असेल व निर्बंध केला असेल त्या कायद्यांस या आईनांमधील कोणत्याहि ठरावावरून व्यत्यय येतो असें समजूं नये."

२ ऱ्या भागाच्या १ ल्या सदराच्या ऐवजीं नवीन सदर दाखल करणें.

६. सदहू आईनांच्या २ ऱ्या भागाच्या १ ल्या सदराच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"सदर १.—पटांत नांव दाखल करणें, प्रतिज्ञा करणें, बर्तर्फ करणें व फांटा देणें.

पटांत नांव दाखल करणें व प्रतिज्ञा करणें.

"आईन १.—(१) कोणत्या मनुष्यांचीं किंवा कोणत्या वर्गाच्या मनुष्यांचीं नांवें फक्त पटांत दाखल करावीं अगर कोणत्या मनुष्यांचीं किंवा कोणत्या वर्गाच्या मनुष्यांचीं नांवें पटांत दाखल करून त्यांजकडून प्रतिज्ञा करवावी तें जाहिरनामा प्रसिद्ध करून ठरविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस अधिकार आहे.

पटांत नांव दाखल करण्याची रीति.

(२) एकाद्या मनुष्याचें नांव त्याच्या अनुमतानें मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्कराच्या एकाद्या कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या यादीवर ठरविलेल्या रीतीनें दाखल करण्यांत आलें ह्मणजे त्याचें नांव या आईनांअन्वयें पटांत दाखल केलें असें समजलें पाहिजे.

प्रतिज्ञा करण्याची रीति.

(३) रिक्रूटांसंबंधीं या आईनांच्या ठरावांस अनुसरून, या आईनांअन्वयें प्रतिज्ञा करवावयाच्या प्रत्येक मनुष्यास ठरविलेल्या सिव्हिल किंवा लष्करी अमलदारापुढें घेऊन गेलें पाहिजे, आणि त्या अमलदारानें, प्रतिज्ञेच्या ठरविलेल्या नमुन्यांत नमूद केलेले सवाल व इतर कोणत्याहि गोष्टी ठरविलेल्या असल्यास त्या, त्या मनुष्यास वाचून दाखविल्या पाहिजेत व समजून दिल्या पाहिजेत अगर त्यास त्याचे समक्ष वाचवून दाखविल्या पाहिजेत किंवा समजून देवविल्या पाहिजेत; आणि प्रतिज्ञेच्या नमुन्यांत नमूद केलेल्या कोणत्याहि सवालाचा तूं खोटा जबाब दिलास तर तुला या आईनांमध्यें ठरविल्याप्रमाणें शिक्षा केली जाण्यास तूं पात्र होशील अशी त्यास ताकीद दिल्यानंतर, त्या अमलदारानें प्रत्येक सवालाचा जबाब लिहून घेतला पाहिजे, व त्या मनुष्यास ते सवाल पूर्णपणें समजत असून प्रत्येक सवालाचा जबाब त्या सवालाचे समोर बरोबर लिहिला आहे अशी त्या अमलदाराची खात्री झाल्यास आणि कोणताहि अडथळा नाहीं असें त्यास वाटल्यास त्यानें त्या मनुष्याकडून ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें प्रतिज्ञा किंवा शपथ करविली पाहिजे.

(४) या आईनांअन्वयें ठरविलेल्या प्रतिज्ञेच्या किंवा शपथेच्या नमुन्यांत, मी मलिका मुआज्ञमा व यांचे वारस व जायनिशी यांशीं इमानानें चालेन, आणि मलिका मुआज्ञमांच्या हिंदुस्थानच्या लश्करांत नोकरी करीन व खुष्कीनें किंवा जलमार्गानें जेथें मला जाण्याविषयीं हुकुम होईल तेथें मी जाईन, आणि माझ्यावरील कोणत्याहि अमलदाराचे सर्व हुकुम मी आपले जिवाकडेही न पाहतां मानीन असें प्रतिज्ञा करणाऱ्या मनुष्याचें वचन लिहिलेलें असलें पाहिजे.

(५) एकादा रिक्रूट चाकरी करण्यास योग्य झाला आहे असें जाहीर झालें म्हणजे ठरविलेल्या रीतीनें त्याजकडून कमाण्डिंग आफिसरानें, कोराच्या पुढें किंवा कोराचा जेवढा भाग अगर डिपार्टमेंटाचे जितके लोक हजर असतील तेवढ्या भागापुढें अगर लोकांपुढें, त्याच नमुन्याप्रमाणें प्रतिज्ञा किंवा शपथ करविली पाहिजे.

(६) प्रतिज्ञा किंवा शपथ करविल्यानंतर, प्रतिज्ञेच्या कागदावर सदर्हू आफिसरानें त्या प्रतिज्ञेच्या खरेपणाबद्दल आपली सही केली पाहिजे आणि मग त्या मनुष्याची प्रतिज्ञा झाली असें मानलें पाहिजे.

(७) ज्या कोणत्याहि कानू ठरविण्यांत येतील त्यांस अनुसरून इंडियाचे कमाण्डर इन् चीफ् हे किंवा कमाण्डचा जनरल आफिसर हा, प्रतिज्ञा झालेले मनुष्य म्हणून ज्या कोणत्याहि मनुष्यांना हे आईन लागू असतील त्यांचीं नांवें पटांत दाखल केलीं आहेत असें या आईनांच्या कारणांसाठीं मानावें, व पटांत नांवें दाखल केलेले मनुष्य म्हणून ज्या कोणत्याहि मनुष्यांना हे आईन लागू असतील त्यांची प्रतिज्ञा झाली आहे असें या आईनांच्या कारणांसाठीं मानावें असें फर्मावण्यास मुखत्यार आहे. — कित्येक बाबतींत पटांत नांव दाखल करणें व प्रतिज्ञा करणें यांचा सारखाच परिणाम आहे असें समजणें.

"आईन २.—(१) इंग्लंड देशाचा सैन्याबाबद आक्ट याच्या ठरावांस पात्र राहून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे जाहिरनामा प्रसिद्ध करून, हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याहि वर्गांचे मनुष्य तद्देशीय अमलदार, वारंट आफिसर किंवा गैरसनदी अमलदार आहेत असें या आईनांच्या कोणत्याहि कारणांसाठीं मानावें म्हणून फर्माविण्यास मुखत्यार आहेत; आणि, — दरजा व ताबेदारी.

(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र राहून, कोणताहि ठरविलेला अधिकारी अशा कोणत्याहि मनुष्याच्या संबंधानें सदर्हूप्रमाणें फर्माविणारा हुकुम काढण्यास मुखत्यार आहे.

(३) या आईनाअन्वयें काढलेला कोणताहि जाहिरनामा किंवा हुकुम रद्द करण्यास, तो ज्या अधिकाऱ्यानें काढला असेल तो अधिकारी मुखत्यार आहे; आणि,

(४) सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र राहून, सदर्हू वर्गांच्या ज्या कोणत्याहि मनुष्याच्या संबंधानें असा कोणताहि जाहिरनामा किंवा हुकुम अमलांत नसेल तो मनुष्य गैरसनदी अमलदाराच्या दरज्याहून कमी दरज्याचा आहे असें या आईनांच्या सर्व कारणांसाठीं, होईल तेथवर, मानलें पाहिजे.

(५) हे आईन लागू असणाऱ्या इतर कोणत्याहि मनुष्याच्या दरज्याच्या संबंधानें, किंवा असा कोणताहि मनुष्य एकाद्या निर्दिष्ट केलेल्या दर्ज्याच्या वरच्या दर्ज्याचा आहे किंवा खालच्या दर्ज्याचा आहे या संबंधानें कोणताहि प्रश्न उपस्थित झाल्यास, त्यावर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं केलेला निकाल अखेरचा आहे असें समजावें.

(६) हे आईन लागू असलेला प्रत्येक मनुष्य, तो ज्याच्या दिमतीस असेल असें कोणतेंही कोर किंवा डिपार्टमेंट असल्यास त्या कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या कमाण्डिंग आफिसराच्या हाताखालीं, व तो मनुष्य कोणत्याहि कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या दिमतीस नसल्यास तो ज्या फौजेंत विवक्षित काळीं नोकरी करीत असेल त्या फौजेचा ताबा अस-

णाऱ्या जनरल किंवा इतर आफिसरानें त्याचा कमाण्डिंग आफिसर ह्मणून ज्या कोणत्याहि अमलदारास विवक्षित काळीं नेमलें असेल त्या अमलदाराच्या हाताखालीं, अगर इतर कोणत्याहि ठरविलेल्या अमलदाराच्या हाताखालीं, किंवा, असा कोणताहि अमलदार नेमलेला अगर ठरविलेला नसल्यास सदहू ताबा असणाऱ्या जनरल अगर इतर आफिसराच्या हाताखालीं आहे असें या आईनांच्या कारणांसाठीं मानलें पाहिजे.

मात्र इतकेंच कीं ताबा असणाऱ्या जनरल किंवा इतर आफिसरानें कोणत्याहि मनुष्यास, तो मनुष्य जेथें असेल त्या जागीं त्यास ज्याच्या हाताखालीं ठेवतां येईल असा त्याच्या दरज्याहून मोठ्या दरज्याचा कोणताहि अमलदार हजर असल्यास, त्या मनुष्याच्या स्वतःच्या दरज्याहून हुद्याच्या नात्यानें कमी दरज्याच्या अमलदाराच्या हाताखालीं ठेवूं नये.

सनदी अमलदारांस बर्तर्फ करणें व फांटा देणें.

"आईन ३.—(१) प्रत्येक सनदी अमलदार, जनरल कोर्ट-मार्शलानें केलेल्या शिक्षेच्या ठरावावरून नोकरींतून बर्तर्फ केला जाण्यास, व इंडियाचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या किंवा इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांच्या किंवा तो अमलदार ज्या कमाण्डचा असेल त्या कमाण्डच्या जनरल आफिसराच्या हुकुमानें बर्तर्फ केला जाण्यास किंवा फांटा दिला जाण्यास पात्र आहे असें समजावें.

(२) या आईनांअन्वयें बर्तर्फ करण्यांत आलेल्या सनदी अमलदाराचा पेनशनाविषयींचा सर्व दावा रद्द होईल.

इतर मनुष्यांना बर्तर्फ करणें व फांटा देणें.

"आईन ४.—(१) सनदी अमलदार खेरीजकरून हे आईन लागू असलेला प्रत्येक मनुष्य—

(अ) त्याचा इनसाफ करण्याचा अधिकार मिळालेल्या कोणत्याहि कोर्ट-मार्शलाच्या शिक्षेच्या ठरावावरून नोकरींतून बर्तर्फ केला जाण्यास, आणि

(ब) इंडियाचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या, किंवा इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांच्या, किंवा तो ज्या कमाण्डचा असेल त्या कमाण्डच्या जनरल आफिसराच्या, किंवा तो ज्या डिव्हिजनांत अगर डिस्ट्रिक्टांत नोकरी करीत असेल त्या डिव्हिजनाचा अगर डिस्ट्रिक्टाचा ताबा असणाऱ्या जनरल आफिसराच्या हुकुमानें, अथवा तो कमाण्डच्या दिमतीस नसणाऱ्या फौजेंतील असामी असल्यास अशा फौजेचा ताबा असणाऱ्या अमलदाराच्या हुकुमानें बर्तर्फ केला जाण्यास, किंवा फांटा दिला जाण्यास,

पात्र आहे असें समजावें.

(२) सदहूप्रमाणें बर्तर्फ केलेल्या प्रत्येक मनुष्याचा पेनशनाविषयींचा सर्व दावा रद्द होईल.

प्रतिज्ञा केलेल्या मनुष्यास बर्तर्फ केला असून किंवा फांटा दिला असून तो पुनः चाकरीस राहील किंवा त्याच्या प्रतिज्ञेच्या वेळीं खोटा जबाब देईल तर.

"आईन ५.—(१) गैरसनदी अमलदाराच्या दरज्याच्या किंवा त्याहून कमी दरज्याच्या प्रतिज्ञा केलेल्या ज्या मनुष्यास नोकरींतून बर्तर्फ केला असून किंवा फांटा दिला असून जो पुढें आपणास बर्तर्फ केल्याची किंवा फांटा दिल्याची गोष्ट जाहीर केल्यावांचून, अगर बर्तर्फीचें किंवा फांटा मिळाल्याचें आपलें सर्टिफिकेट दाखविल्यावांचून पुनः नोकरीस राहील तशा प्रत्येक मनुष्यास नोकरींतून बर्तर्फ करण्याचा अधिकार, तो ज्या कोरांत किंवा डिपार्टमेंटांत नोकरी करीत असेल त्या कोराचा किंवा डिपार्टमेंटाचा ताबा असणाऱ्या अमलदारास आहे.

(२) गैरसनदी अमलदाराच्या दरज्याच्या किंवा त्याहून कमी दरज्याच्या प्रतिज्ञा केलेल्या ज्या मनुष्यानें, तो प्रतिज्ञा करण्याच्या कारणासाठीं ज्या अमलदारापुढें हजर होईल त्या अमलदारानें किंवा त्या अमलदाराच्या हुकुमानें त्यास केलेल्या प्रतिज्ञेच्या कागदांतील कोणत्याहि सवालास बुद्ध्या खोटा जबाब दिला आहे असें आढळून येईल तो

प्रत्येक मनुष्य, कोर्टमार्शलनें त्यावर गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केला असतां, कैदेची शिक्षा (सक्त मजुरीनिशीं व एकांत कैदेनिशीं किंवा तशा कैदेवांचून) किंवा त्याहून या आईनांमध्यें सांगितली असेल ती कमी शिक्षा भोगण्यास पात्र होईल.

आईन ६.—प्रतिज्ञा केलेल्या ज्या ज्या मनुष्यास नोकरींतून बर्तर्फ केला असेल किंवा फांटा दिला असेल त्या प्रत्येक मनुष्यास त्याच्या कमाण्डिंग आफिसरानें इंग्रेजी भाषेंत व (त्या मनुष्याची जन्मभाषा इंग्रेजी नसेल तेव्हां) त्याच्या जन्मभाषेंत खालीं दिलेला मजकूर लिहून सर्टिफिकेट दिलें पाहिजे. तो मजकूर येणेंप्रमाणें:— बर्तर्फ केलेल्या किंवा फांटा दिलेल्या मनुष्यास सर्टिफिकेट.

(अ) त्यास बर्तर्फ करणारा किंवा फांटा देणारा अधिकारी;

(ब) त्यास बर्तर्फ करण्याचें किंवा फांटा देण्याचें कारण; आणि

(क) लष्करांतील त्याच्या नोकरीची एकंदर मुदत.

७. सदर्हू आईनांपैकीं ७ व्या आईनाच्या १ ल्या वाक्यांतील "कोणतेही पलटणींत किंवा कोरांत किंवा डिव्याचमेंटांत किंवा गार्डांत" हे शब्द यावरून रद्द केले आहेत. ७ व्या आईनाचा भाग रद्द करणें.

८. सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनाच्या तिसऱ्या वाक्याच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— त्याच आईनाच्या तिसऱ्या वाक्याच्या ऐवजीं नवीन वाक्य दाखल करणें.

"अथवा ज्यास कोणताहि दंगा अगर फिसाद झाला आहे किंवा कोणताहि दंगा अगर फिसाद उपस्थित करण्याचा इरादा झाला आहे किंवा सरकाराविरुद्ध कोणताहि मिलाफ झाला आहे अशी माहिती असून किंवा तसें मानण्यास आधार असून,".

९. सदर्हू आईनांपैकीं ८ व्या आईनांत, "व आपला वरिष्ठ अमलदार कोणतेहि रीतीनें ओळखतां येई असें प्रसंगीं त्यावर" या शब्दांच्या बदला "आपल्या वरिष्ठ अमलदारावर, तो आपला वरिष्ठ अमलदार आहे असें जाणून किंवा तसें मानण्यास आधार असून" हे शब्द दाखल करावे. ८ व्या आईनाची सुधारणूक.

१०. सदर्हू आईनांपैकीं १० व्या व ११ व्या आईनांच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— १० व्या व ११ व्या आईनांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"चाकरी सोडून पळून जाणें.

आईन १०.—जो चाकरी सोडून पळून जाईल किंवा चाकरी सोडून पळून जाण्याचा प्रयत्न करील;—अथवा

"फांटा मिळाल्यावांचून पुनः चाकरीत राहणें.

आईन ११.—जो ज्या कोरांतला किंवा डिपार्टमेंटांतला असेल त्या कोरांतून किंवा डिपार्टमेंटातून पहिल्यानें शिरस्त्याप्रमाणें फांटा मिळाल्यावांचून इतर कोणत्याहि कोरांत किंवा डिपार्टमेंटांत चाकरीस राहील;—अथवा".

११. सदर्हू आईनांपैकीं २४ व्या आईनाच्या शेवटल्या पारिग्राफाच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— २४ व्या आईनाची सुधारणूक.

"जेव्हां कोणत्याहि मनुष्यावर, ७ व्या आईनांत निर्दिष्ट केलेला व या आईनाअन्वयें मरणाची शिक्षा करण्यायोग्य गुन्हा केल्याच्या शाबितीचा ठराव होईल तेव्हां त्याचा सर्व स्थावर व जंगम माल सरकारदाखल होईल."

१२. सदर्हू आईनांपैकीं २५ व्या व २६ व्या आईनांच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— २५ व्या व २६ व्या आईनांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"अयोग्य वर्तणूक.

आईन २५.—कोणताहि अमलदार, त्यांतील वैद्यकीय अमलदार, किंवा वारंट आफिसर, जो आपल्या हुद्यास व अब्रूस अयोग्य अशा रीतीनें वर्तणूक करील;—आणि

"ड्यूटीवर असतां कैफ आलेल्या स्थितींत असणें.

"आईन २६.—हे आईन लागू असणारा कोणताहि मनुष्य—

जो कोणत्याहि ड्यूटीवर असतां किंवा ड्यूटीवर जाण्याची ताकीद दिल्यानंतर, अगर परेडीवर असतां अगर कूच करीत असतां कैफ आलेल्या स्थितींत असेल;—अथवा".

३१ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१३. सदर्हू आईनांपैकीं ३१ व्या आईनाच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"परत दाखल होण्यास चुकणें.

"आईन ३१.—जो, रजेवर असतां, आपल्या कोरास किंवा डिपार्टमेंटास कामगिरीवर जाण्याचा हुकुम झाला आहे अशी बातमी योग्य अधिकाऱ्याकडून पोंहचल्यावर विलंब न लावतां, पुरते कारणावांचून, आपल्या कामावर परत दाखल होण्यास चुकेल; —अथवा".

३९ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१४. सदर्हू आईनांपैकीं ३९व्या आईनाच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"प्रोवोस्ट मार्शलास हरकत करणें.

"आईन ३९.—जो, प्रोवोस्ट मार्शलास, किंवा असिस्टंट प्रोवोस्ट मार्शलास, किंवा प्रोवोस्ट मार्शलाचे हाताखालीं अगर त्याच्या वतीनें कायदेशीर रीतीनें अधिकार चालविणाऱ्या कोणत्याहि अमलदारास अगर गैरसनदी अमलदारास अगर इतर मनुष्यास हरकत करील, अथवा प्रोवोस्ट मार्शल, असिस्टंट प्रोवोस्ट मार्शल, किंवा कोणताहि सदर्हू प्रकारचा अमलदार, गैरसनदी अमलदार किंवा इतर मनुष्य आपलें काम करण्यांत मदत मागेल तेव्हां त्यास मदत करण्यास नाकारील;—अथवा".

४० व्या आईनाची दुरुस्ती.

१५. सदर्हू आईनांपैकीं ४० व्या आईनांत "या आईनाअन्वयें" व "प्रतिज्ञा केलेला" या शब्दांच्या दरमियान "पटांत नांव दाखल केलेला किंवा" हे शब्द दाखल करावे.

४७ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१६. सदर्हू आईनांपैकीं ४७ व्या आईनाच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"पलटणीसंबंधी जरूरीचे सामानाची वाट लावणें.

"आईन ४७.—जो—

(अ) बुद्ध्या किंवा हयगयीनें आपल्या घोड्यास ठार मारील, इजा करील किंवा हरवील, अगर सरकारच्या नोकरींत वापरण्यांत येत असलेल्या कोणत्याहि जनावरास वाईट रीतीनें वागवील;—अथवा

(ब) आपलीं शस्त्रें, कपडे, हत्यारें, वाद्यें, शस्त्रवैद्यकीचीं हत्यारें, सरंजाम, युद्धसामग्री, शिपायगिरीचे कपडे वगैरे सामान किंवा पलटणीसंबंधी जरूरीच्या वस्तु, अगर त्याचे स्वाधीन केले असतील किंवा इतर कोणत्याहि मनुष्याचे असतील असे सदर्हू प्रकारचे कोणतेहि जिन्नस लबाडीनें किंवा कपटानें नेईल अगर लपवील अगर कोणत्याहि मनुष्यास देईल, किंवा बुद्ध्या किंवा हयगयीनें त्यांस नुकसान करील अगर हरवील;—अथवा

(क) लढाईंत चाकरी बजाविल्याबद्दल किंवा साधारण चांगल्या वर्तणुकी-बद्दल मलिका माआझमांच्या किंवा इंडियाचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून त्यास दिलेला कोणताहि चांद किंवा अलंकार विकील, गहाण ठेवील, किंवा त्याचा नाश करील अगर त्यास छिन्नभिन्न करील; अथवा,".

१७. सदहू आईनांपैकीं ४८ व्या आईनांत "करील" व "सदहू" या शब्दांच्या दरमियानच्या "आणि" या शब्दाबद्दल "किंवा" हा शब्द दाखल करावा. ४८ व्या आईनाची सुधारणूक.

१८. सदहू आईनांपैकीं ५७ व्या आईनाच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :— ५७ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"आईन ५४, ५५ व ५६ यांत सांगितलेल्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा.

"आईन ५७.—त्यावर जनरल कोर्ट-मार्शलानें गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केल्यास त्यास चाकरींतून बर्तर्फ करण्याच्या व बर्तर्फ करतेवेळीं त्याच्या पगाराचा व नेमणुकांचा, जो कोणताहि ऐवज बाकी निघत असेल त्यावरील त्याचा दावा रद्द करण्याच्या शिक्षेचा ठराव करावा, आणि तो (सक्त मजुरीनिशीं किंवा सक्त मजुरीवांचून व एकांत कैदेनिशीं किंवा तशा कैदेवांचून) पराकाष्टा दोन वर्षेंपर्यंत कैदेच्या शिक्षेसहि पात्र होईल : आणि त्यावर डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलानें गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केल्यास, अशा कोर्टास ज्या शिक्षा करण्याचा अधिकार असेल त्यांपैकीं कोणत्याहि किंवा सर्व शिक्षांस तो पात्र होईल.

१९. सदहू आईनांपैकीं ६५ व्या आईनांतील "इतर" हा शब्द गाळावा. ६५ व्या आईनाची सुधारणूक.

२०. सदहू आईनांपैकीं ६६ व्या आईनाच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— ६६ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"आईन ५८ ते ६५ यांत निर्दिष्ट केलेल्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा.

"आईन ६६.—त्यावर जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलानें अपराधाच्या शाबितीचा ठराव केल्यास, मरणाची किंवा काळ्या पाण्याची शिक्षा खेरीज करून इतर ज्या शिक्षा करण्याचा अधिकार अशा कोर्टास असेल त्यांपैकीं कोणत्याहि, किंवा सर्व शिक्षांस तो पात्र होईल.

२१. सदहू आईनांपैकीं ६९ व्या आईनांत "जी शिक्षा ठरविण्याचा अधिकार असेल त्या शिक्षेस" या शब्दांच्या बदला "मरणाची किंवा काळ्या पाण्याची शिक्षा खेरीज करून इतर ज्या शिक्षा ठरविण्याचा अधिकार असेल त्यांपैकीं कोणत्याहि किंवा सर्व शिक्षांस" हे शब्द दाखल करावे. ६९ व्या आईनाची सुधारणूक.

२२. सदहू आईनांपैकीं ७१ व्या आईनाच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— ७१ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"साह्य.

"आईन ७१.—जो जो मनुष्य या आईनांअन्वयें शिक्षा करण्यायोग्य कोणताहि गुन्हा करण्यास, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा याच्या अर्थाप्रमाणें, साह्य करील त्या प्रत्येक मनुष्यास तशा गुन्ह्याबद्दल या आईनांमध्यें मागें ठरविलेली शिक्षा करण्याचा अधिकार आहे."

२३. सदहू आईनांपैकीं आईन ७२ ते ७४ यांबद्दल खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे :— आईन ७२ ते ७४ यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

कोर्ट-मार्शलें व त्यांचे प्रकार.

"आईन ७२.—या आईनांच्या कारणांसाठीं पांच प्रकारचीं कोर्ट-मार्शलें ठरविलीं आहेत, म्हणजे :—

(१) जनरल कोर्ट-मार्शलें.
(२) डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलें.
(३) रेजिमेंटल कोर्ट-मार्शलें.
} यांस यांत पुढें आर्डिनरी कोर्ट-मार्शलें म्हटलें आहे.

(४) समरी जनरल कोर्ट-मार्शलें.
(५) समरी कोर्ट-मार्शलें.
} यांस यांत पुढें एक्स्ट्रेआर्डिनरी कोर्ट-मार्शलें म्हटलें आहे.

आर्डिनरी कोर्ट-मार्शलें.

आर्डिनरी कोर्ट-मार्शलें भरण्याचा अधिकार.

"आईन ७३.—(१) जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलें भरण्याचा अधिकार खालीं सांगितलेल्या अधिकाऱ्यांस आहे असें समजावें, म्हणजे:—

(अ) इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांस,

(ब) कमाण्डचा जनरल आफिसर यास,

(क) इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांच्या किंवा कमाण्डचा जनरल आफिसर याच्या वारंटावरून त्या बाबतींत ज्या कोणत्याहि अमलदारास अधिकार मिळाला असेल त्या अमलदारास.

(२) रकम (१), पोट-रकम (क) याअन्वयें जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट मार्शलें भरण्याचा अधिकार देणें तो, इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांस किंवा तसा अधिकार देणारा कमाण्डचा जनरल आफिसर यास योग्य वाटतील त्या अटींस, निर्बंधास, अपवादांस व शर्तीस पात्र करून देण्याचा अख्त्यार आहे.

(३) जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलें अगर दोन्हीं प्रकारचीं कोर्ट-मार्शलें भरण्याबद्दलचें या आईनाअन्वयेंचें कोणतेंहि वारंट एकाद्या अमलदारास पाठविणें तें त्या अमलदाराच्या नांवानें किंवा त्याच्या हुद्याच्या नांवानें, अगर कांहीं अंशीं त्याच्या नांवानें व कांहीं अंशीं त्याच्या हुद्याच्या नांवानें पाठविण्याचा अधिकार आहे, आणि त्यांतील शर्तींबरहुकुम व तें ज्या रीतीनें लिहून पाठविलें असेल त्या रीतीबरहुकुम त्यांत नांव लिहिलेल्या अमलदारासच तें लागू करण्याचा किंवा लागू न करण्याचा, किंवा अशा अमलदारांचीं कामें विवक्षित काळीं करणाऱ्या कोणत्याहि मनुष्यास किंवा अशा अमलदाराची कमाण्ड प्राप्त झालेल्या त्याच्या स्थानापन्नांस लागू करण्याचा किंवा लागू न करण्याचा अधिकार आहे.

जनरल कोर्ट-मार्शलांची रचना.

"आईन ७४.—जनरल कोर्ट-मार्शल ब्रिटिश इंडियांत भरल्यास त्यांत निदान सात तरी अमलदार असले पाहिजेत, मात्र सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देऊन तितके अमलदार मिळण्याजोगे नसतील त्या प्रसंगीं त्या कोर्टांत निदान पांच तरी अमलदार असले पाहिजेत.

आईन ७५,७७,७८व७९ रद्द करणें.

२४. सदर्हू आईनांपैकीं आईन ७५, ७७, ७८ व ७९ हे यावरून रद्द केले आहेत.

७६ व्या आईनाची सुधारणूक.

२५. सदर्हू आईनांपैकीं ७६ व्या आईनांत, "दरज्या कमी करून शिपाई करण्याची शिक्षा" या शब्दांच्या बदला "दरजा कमी करून खालच्या पायरीचा दरजा करण्याची किंवा शिपाई करण्याची शिक्षा," हे शब्द दाखल करावे.

आईन ८० व ८१ यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

२६. सदर्हू आईनांपैकीं ८० व्या व ८१ व्या आईनांच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलची रचना.

"आईन ८०.--डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलांत निदान पांच तरी अमलदार असले पाहिजेत, मात्र सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देऊन तितके अमलदार मिळण्याजोगे नसतील त्या प्रसंगीं त्या कोर्टांत निदान तीन तरी अमलदार असले पाहिजेत.

"आईन ८१.—डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलाचे सगळे अमलदार, जरूर असेल तेव्हां, आरोप आलेला मनुष्य ज्या कोराचा किंवा डिपार्टमेंटाचा असेल त्या कोराचे किंवा डिपार्टमेंटाचे असण्यास हरकत नाहीं.

८२ व्या आईनाची सुधारणूक.

२७. सदहू आईनांपैकीं ८२ व्या आईनांत, "दंग्याखेरीज ज्या इतर गुन्ह्याबदल" या शब्दांच्या बदला "ज्या गुन्ह्यांबदल" हे शब्द, आणि "डिस्ट्रिक्ट किंवा ग्यारिसन" व "ग्यारिसन किंवा डिस्ट्रिक्ट" या शब्दांच्या बदला "डिस्ट्रिक्ट" हा शब्द दाखल करावा.

त्याच आईनाची आणखी सुधारणूक.

२८. सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनांत, "पराकाष्ठा एक वर्षाचे कैदेची" या शब्दांच्या बदला "पराकाष्ठा दोन वर्षांच्या कैदेची" हे शब्द, आणि "दरज्या कमी करून शिपाई करायाची शिक्षा" या शब्दांच्या बदला "दरज्या कमी करून खालच्या पायरीचा दरजा करण्याची किंवा शिपाई करण्याची शिक्षा," हे शब्द दाखल करावे.

८२ व्या आईनाच्या नंतर नवीन आईन दाखल करणें.

२९. सदहू आईनांपैकीं ८२ व्या आईनानंतर खालीं लिहिलेला आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

[कोर्ट-मार्शल] भरण्याविषयींच्या हुकुमांत, जास्त अमलदार मिळण्याजोगे नसल्यास तसें लिहिलें असलें पाहिजे.

आईन ८२ अ.—जेव्हां जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलांत, ७४ व्या किंवा ८० व्या आईनांत निर्दिष्ट केलेल्या अमलदारांच्या संख्येहून कमी संख्या असावी असा हुकुम केला असेल तेव्हां असें कोर्ट भरण्याविषयींच्या हुकुमांत, सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देऊन ज्यास्त अमलदार मिळण्याजोगे नाहींत असें स्पष्ट लिहिलें पाहिजे; आणि तो लिहिलेला मजकूर त्याप्रमाणें लिहिलेल्या गोष्टीचा निरुत्तर पुरावा असेल असें समजावें."

आईन ८४ व ८५ यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

३०. सदहू आईनांपैकीं आईन ८४ व ८५ यांच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

रेजिमेंटल कोर्ट-मार्शलाची रचना.

"आईन ८४.—रेजिमेंटल कोर्ट-मार्शलांत निदान तीन तरी अमलदार असले पाहिजेत.

अशा कोर्टाचे अधिकार.

"आईन ८५.—रेजिमेंटल कोर्ट-मार्शलास, हे आईन लागू असणाऱ्या व गैरसनदी अमलदाराच्या दरज्याहून वरच्या दरज्यांचे नाहींत अशा सर्व मनुष्यांचा—

(अ) आईन ७ ते २३ (दोन्ही धरून), आईन ९९ ते ६९ (दोन्ही धरून) किंवा आईन १७१ ते १७३ (दोन्ही धरून) यांअन्वयें शिक्षा करण्याजोगे गुन्हे खेरीज करून इतर या आईनांअन्वयें कोर्ट-मार्शलानें इन्साफ करण्याजोग्या कोणत्याहि गुन्ह्याबदल, आणि,

(ब) ठरविलेल्या अधिकाऱ्याची पूर्वीं मंजुरी घेऊन, सदरीं ज्या गुन्ह्यांच्या संबंधानें अपवाद ठरविला आहे त्यांतून कोणत्याहि गुन्ह्याबदल,

इन्साफ करण्याचा अधिकार आहे.

अशा कोर्टाचे शिक्षा देण्याचे अधिकार.

"आईन ८५ अ.—एकाद्या गुन्ह्याबदल दरजा, पगार व नेमणुका मह्कूब करण्याची शिक्षा खेरीज करून जी कोणतीहि इतर शिक्षा करण्याचा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलास अधिकार आहे तीच शिक्षा तशा अपराधाबदल करण्याचा अधिकार रेजिमेंटल कोर्ट-मार्शलास आहे.

मात्र इतकेंच कीं रेजिमेंटल कोर्ट मार्शलानें कोणताहि साहा महिन्यांहून अधिक मुदतीपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेचा, व १३९ व्या आईनांत ज्या आणखी ज्यास्त शिक्षा निर्दिष्ट केल्या आहेत त्यांपैकीं कोणत्याहि शिक्षेचा ठराव करतां नये.

आईन ८६ ते ८९ यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

३१. सदर्हू आईनांपैकीं आईन ८६ ते ८९ यांच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

एतद्देशीय व ब्रिटिश अमलदारांना केव्हां नेमणें.

"आईन ८६.—(१) सदरील ठरावांअन्वयें भरलेल्या कोर्ट-मार्शलांत जे अमलदार असावयाचे ते, यांत पुढें ठरविलें आहे त्याप्रसंगीं खेरीज करून, एतद्देशीय अमलदार असले पाहिजेत.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल, किंवा इंडियाचे कमाण्डर इन् चीफ, किंवा कमाण्डचा जनरल आफिसर, अगर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं किंवा इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांनीं किंवा कमाण्डचा जनरल आफिसर यानें अधिकार दिलेला कोणताहि अमलदार, यांस, या आईनांअन्वयें भरलेल्या कोणत्याहि कोर्ट-माशलांत एतद्देशीय अमलदारांच्या बदला ब्रिटिश अमलदार असावे असें फर्मावण्याचा अधिकार आहे.

(३) हे आईन लागू असलेल्या ज्या कोणत्याहि मनुष्याचा कोर्ट मार्शलाकडून इन्साफ होण्याविषयीं हुकूम झाला असेल त्या मनुष्यास, आपला इन्साफ ब्रिटिश अमलदारांकडून व्हावा असा दावा सांगण्याचा अधिकार आहे.

(४) सर्व प्रसंगीं असा दावा सांगण्याचा हक्क, कोर्ट भरण्याच्या पूर्वीं, ज्या मनुष्याचा इन्साफ होण्याविषयीं हुकूम झालेला असेल त्या मनुष्यास कमाण्डिंग आफिसरानें, किंवा या बाबतींत कमाण्डिंग आफिसर ज्या कोणा अमलदारास नेमील त्या अमलदारानें, समजून दिला पाहिजे, आणि असा दावा सांगण्यांत येईल तेव्हां कोर्टाची रचना त्याप्रमाणें केली पाहिजे.

(५) हे आईन लागू असणाऱ्या व कोणत्याहि ब्रिटिश कोरांत किंवा डिट्याचमेंटांत नोकरी करणाऱ्या कोणत्याहि मनुष्याचा इन्साफ करण्यासाठीं भरावयाच्या कोर्ट-मार्शलांत, सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देऊन एतद्देशीय अमलदार त्या कोर्टांत काम करण्यासाठीं मिळण्याजोगे नाहींत असें कोर्ट भरणाऱ्या अमलदाराचें मत (हें मत कोर्ट भरण्याविषयींच्या हुकुमांत स्पष्टपणें लिहिलें पाहिजे व तें अखेरचें असेल) असल्यास, ब्रिटिश अमलदार असण्यास हरकत नाहीं.

एतद्देशीय कोर्ट-मार्शलासाठीं जज्ज आड्व्होकेट, आणि सुपरिंटेंडिंगची नेमणूक.

"आईन ८७.—(१) प्रत्येक जनरल कोर्ट-मार्शलांत एक जज्ज आड्व्होकेट हजर असला पाहिजे.

(२) जज्ज आड्व्होकेट जनरलाच्या खात्याचा कोणी अमलदार मिळण्याजोगा नसल्यास, कोर्ट भरणाऱ्या अमलदारानें इन्साफाच्या वेळीं जज्ज आड्व्होकेटाचें काम करण्यासाठीं योग्य मनुष्यास नेमलें पाहिजे.

(३) कोणत्याहि कोर्ट-मार्शलाकडून ज्याचा इन्साफ होण्याविषयीं हुकूम झाला असेल किंवा ज्याचा इन्साफ होत असेल अशा कोणत्याहि मनुष्यास, जज्ज आड्व्होकेट ह्मणून काम करणाऱ्या किंवा जज्ज आड्व्होकेटाचें काम करणाऱ्या कोणत्याहि मनुष्याच्या संबंधानें, कोर्टाच्या परवानगीवांचून, हरकत घेण्याचा अधिकार नाहीं.

(४) एतद्देशीय अमलदारांच्या ज्या ज्या कोर्ट-मार्शलांत जज्ज आड्व्होकेट हजर नसेल त्या प्रत्येक कोर्ट-मार्शलानें चालविलेल्या कामांवर देखरेख ठेवण्यासाठीं, ज्याची नोकरी चार वर्षांहून कमी झालेली नाहीं असा एक ब्रिटिश अमलदार नेमला पाहिजे. या अमलदारास यांत पुढें सुपरिंटेंडिंग आफिसर असें ह्मटलें आहे.

अध्यक्ष.

"आईन ८८.—(१) प्रत्येक कोर्ट-मार्शलाच्या वेळीं, जो अमलदार सीनियर असेल त्यानें, त्याची अध्यक्ष ह्मणून मुद्दाम नेमणूक करण्यांत आल्यावांचून, अध्यक्ष ह्मणून बसलें पाहिजे.

२. अध्यक्ष मरण पावल्यास किंवा त्याला गैरहजर राहणें अगत्य पडल्यास, त्याच्या लगत खालच्या सीनियर अमलदारानें, त्याची अध्यक्ष ह्मणून मुद्दाम नेमणूक करण्यांत आल्यावांचून, अध्यक्षाची जागा घेतली पाहिजे, आणि कोर्टांत कमींत कमी जेवढे अमलदार असणें या आईनांवरून जरूर असेल तितक्या अमलदारांहून कमी अमलदार त्या कोर्टांत नसतील तर इन्साफाचें काम पुढें चाललें पाहिजे.

ठराव (फाइंडिंग) व शिक्षेचा ठराव मंजुरीवांचून रद्द होणें.

"आईन ८९.—जनरल, डिस्ट्रिक्ट किंवा रेजिमेंटल कोर्ट-मार्शलाचा कोणताहि ठराव (फाइंडिंग) किंवा शिक्षेचा ठराव, या आईनांवरून ठरविलें आहे त्याप्रमाणें मंजूर केला असेल तेथवर खेरीज करून बाकी कायदेशीर आहे असें समजूं नये.

ठराव व शिक्षेचा ठराव मंजूर करण्याचा किंवा इतर प्रकारें त्यांचा निकाल करण्याचा कोणास अधिकार आहे.

"आईन ८९ अ.—जनरल व डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलांचे ठराव व शिक्षेचे ठराव मंजूर करण्याचा अधिकार खालीं सांगितलेल्या अधिकाऱ्यांस आहे, ते अधिकारी येणेंप्रमाणें :—

(अ) इंडियाचे कमाण्डर इन चीफ्;

(ब) कमाण्डच्या जनरल आफिसराच्या ताब्यांतील फौजेचें जेथें ठाणें असेल तेथें त्या फौजेच्या संबंधानें कमाण्डचा जनरल आफिसर;

(क) कमाण्डच्या दिमतीस नसलेल्या फौजेचा ताबा असणारा अमलदार;

(ड). इंडियाचे कमाण्डर इन् चीफ् यांच्या किंवा कमाण्डचा जनरल आफिसर याच्या वारंटावरून त्या बाबतींत अधिकार मिळालेला कोणताहि अमलदार :

मात्र इतकेंच कीं मोहिमीवर किंवा इंडियाच्या हद्दींबाहेर खेरीज करून, एकाद्या अमलदाराच्या, ताब्यांतील वैद्यकीय अमलदाराच्या किंवा वारंट आफिसराच्या बाबतींत केलेला कोणताहि ठराव किंवा शिक्षेचा ठराव, अगर कोणत्याहि बाबतींत झालेला मरणाच्या, काळ्या पाण्याच्या किंवा सात वर्षांहून ज्यास्त मुदतीच्या कैदेच्या शिक्षेचा ठराव मंजूर करण्याचा अधिकार एकाद्या अमलदारास या आईनाअन्वयें काढलेल्या कोणत्याहि वारंटावरून प्राप्त होतो असें समजूं नये.

(२) आईन ७३, रकमा (२) व (३) यांतील ठराव, जरूर असेल त्या फेरफारांनिशीं, या आईनाअन्वयें काढलेल्या वारंटांस लागू आहेत असें समजावें.

(३) रेजिमेंटल कोर्ट-मार्शल भरणाऱ्या अमलदारास किंवा असें कोर्ट-मार्शल भरण्याचा अख्त्यार असलेल्या अमलदारास, त्या कोर्ट-मार्शलाचा ठराव व शिक्षेचा ठराव सादर झाल्याच्या तारखेरोजीं, ते मंजूर करण्याचा अधिकार आहे असें समजावें.

मंजूर करणाऱ्या अमलदाराचा शिक्षा कमी करण्याचा, माफ करण्याचा किंवा बदलून दुसरी शिक्षा देण्याचा अधिकार.

"आईन ८९ ब.—सदरील शेवटल्या आईनाअन्वयें काढलेल्या कोणत्याहि वारंटांत ज्या अटी दिलेल्या असतील त्यांस अनुसरून, मंजूर करणारा अमलदार, कोर्ट-मार्शलानें केलेला शिक्षेचा ठराव मंजूर करते वेळीं, त्यांत ठरविलेली शिक्षा कमी करण्यास किंवा माफ करण्यास अगर ती शिक्षा बदलून, जी कोणतीहि किंवा ज्या कोणत्याहि कमी शिक्षा कोर्ट-मार्शलास गुन्हेगाराला देतां आल्या असत्या ती किंवा त्या कमी शिक्षा देण्यास मुख्त्यार आहे :

मात्र इतकेंच कीं काळ्या पाण्याची शिक्षा बदलून तिच्या ऐवजीं, कोर्टानें ठरविलेल्या काळ्या पाण्याच्या शिक्षेच्या मुदतीहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा देतां नये."

आईन ९० ते ९७ यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३२. सदर्हू आइनांपैकीं आईन ९० ते ९७ यांच्याबदला पुढील आईन दाखल केले पाहिजेत. तें येणेंप्रमाणें:—

"एक्स्ट्रॉऑर्डिनरी कोर्टमार्शलें.

समरी जनरल कोर्टमार्शलें भरविण्याबाबद.

"आईन ९०.—खालील अधिकाऱ्यांस समरी जनरल कोर्टमार्शल भरविण्याचा अखत्यार असून, असें कोर्टमार्शल—

(अ) ब्रिटिश इंडियाच्या आंतील किंवा बाहेरील कोणत्याही जागीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या किंवा इंडियाचे कमांडर-इन्-चीफ् यांच्या किंवा कमांडचा जनरल आफिसर याच्या हुकुमावरून याबावतींत अधिकार मिळालेल्या कोणत्याही अमलदारास;

(ब) जेव्हां मलिका माआझमांच्या सैन्यापैकीं मोहिमींत असणाऱ्या कोणत्याही सुट्या तुकडीचा ताबा असणाऱ्या अमलदाराला, बंदोबस्ताकडे व सरकारी कामाच्या गरजांकडे योग्य लक्ष पुरवून, गुन्ह्याचा इन्साफ ऑर्डिनरी जनरल कोर्टमार्शलाकडून होणें शक्य नाहीं असें वाटेल, तेव्हां अशा अमलदारास,

भरण्याचा अधिकार आहे.

समरी जनरल कोर्टमार्शलांची रचना.

"आईन ९१.—(१) समरी जनरल कोर्टमार्शलांत तिहींहून कमी अमलदार असतां कामानयेत, आणि असें कोर्ट भरणाऱ्या अमलदारास योग्य वाटेल त्याप्रमाणें ते ब्रिटिश किंवा एतद्देशीय असावेत, किंवा ब्रिटिश व एतद्देशीय असे दोन्ही प्रकारचे असावेत.

(२) ह्या आइनांस जोडलेल्या पुरवणींत दिलेल्या नमुन्यावरहुकूम सदरहू कोर्ट भरण्याचा व त्यापुढें चाललेलें काम लिहून घेण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सदरहू कोर्टाकडून व्हावयाच्या अशा कोणत्याही इन्साफाच्या संबंधानें, असें कोर्ट भरणाऱ्या अमलदारास, त्याबाबदचा पुरावा, कैद्याच्या कैफियतीसुद्धां, पूर्णपणें लिहून घेण्याविषयीं विशेष हुकूम करण्याचा अधिकार आहे.

समरी जनरल कोर्टमार्शलाचे अधिकार.

"आईन ९२.—समरी जनरल कोर्टमार्शलास जनरल कोर्टमार्शलचे सर्व अधिकार आहेत, आणि कोर्ट भरण्याबाबदच्या हुकुमांत जें कांहीं फर्माविलें असेल त्यास अनुसरून, त्यानें केलेला शिक्षेचा ठराव कायदेशीर होईल, व डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलास ज्या शिक्षेचा ठराव करण्याचा अधिकार आहे त्याहून जास्त शिक्षेचा तो नसला तर लगेच, आणि इतर कोणत्याही प्रसंगीं, असें कोर्ट भरविणारा अधिकारी बाहाल करील तेव्हां, तो अमलांत आणण्याचा अधिकार आहे.

समरी कोर्टमार्शल भरण्याचा कोणास अधिकार आहे.

"आईन ९३.—(१) समरी कोर्टमार्शल भरण्याचा अधिकार—

(अ) मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या फौजेचें कोणतेंहि कोर किंवा डिपार्टमेंट याच्या, किंवा त्या फौजेच्या कोणत्याही डिव्ह्याचमेंटाच्या कांबटंट कमांडिंग आफिसरास;

(ब) हे आईन लागू असणारे एतद्देशीय कांबटंट लोक ज्या कोणत्याही ब्रिटिश कोराच्या किंवा डिव्ह्याचमेंटाच्या दिमतींत असतील, त्या कोराच्या किंवा डिव्ह्याचमेंटाच्या कमांडिंग आफिसरास,

आहे असें समजावें.

समरी कोर्टमार्शलाची रचना.

(२) दरेक समरी कोर्टमार्शलांत इन्साफ करणारा अमलदार हा एकटाच तें कोर्ट होय असें समजावें, परंतु त्यापुढें काम चालेल त्या सर्व मुदतींत दुसरे दोन ब्रिटिश किंवा एतद्देशीय अमलदार हजर असले पाहिजेत. ह्या संबंधानें ह्या दुसऱ्या अमलदारांकडून प्रतिज्ञा किंवा शपथ करवावयाची नाहीं असें समजावें.

(३) सदर्हू कोर्टापुढें चाललेलें काम इंग्रजी भाषेंत लिहून घेतलें पाहिजे, आणि तें बंद करण्यांत येईल तेव्हां त्यावर इन्साफ करणाऱ्या अमलदारानें आणि त्या वेळीं हजर असणाऱ्या अमलदारांनीं सही केली पाहिजे.

(४) समरी कोर्टमार्शलास, कोणताही अमलदार ताब्यांतील वैद्यकीय अमलदार किंवा वारंट अमलदार यांखेरीज हे आईन लागू असणाऱ्या, व असें कोर्ट भरणाऱ्या अमलदाराच्या ताब्यांत असणाऱ्या इतर कोणत्याही मनुष्याचा इन्साफ करण्याचा अधिकार आहे. समरी कोर्टमार्शलास ज्या मनुष्यांचा इन्साफ करण्याचा अधिकार आहे तीं मनुष्यें.

(५) आर्मी आस्पिटल कोराच्या कोणत्याही असामीवर गुन्ह्याचा आरोप आला असतां त्याचा इन्साफ, तो ज्या डिव्हिजनचा, डिस्ट्रिक्टचा, ब्रिगेडचा किंवा ठाण्याचा असेल, त्याचा तावा असणाऱ्या अमलदारानें या बाबतींत अधिकार दिलेल्या कोणत्याही अमलदारास समरी कोर्टमार्शल करून, करण्याचा अधिकार आहे.

"आईन ९४.—समरी कोर्टमार्शलास, ह्या आइनांपैकीं कोणत्याही आइनाअन्वयें ज्या गुन्ह्याबद्दल शिक्षा करतां येईल अशा कोणत्याही गुन्ह्याचा इन्साफ करण्याचा अधिकार आहे: समरी कोर्टमार्शलास ज्या गुन्ह्यांचा इन्साफ करण्याचा अधिकार आहे ते गुन्हे.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं लागलीच तजवीज करण्याला कोणतेंही मोठें कारण नसून, वरिष्ठ अधिकाऱ्यास लिहून पाठविलें असतां बंदोबस्तास हरकत होत नसेल तेव्हां, समरी कोर्टमार्शलानें, याप्रमाणें लिहून पाठविल्यावांचून, पुढीलपैकीं कोणत्याही गुन्ह्याचा इन्साफ करतां कामा नये. ते गुन्हे येणेंप्रमाणें:—

(अ) आईन ७ ते २३ ह्या सतरांपैकीं, किंवा आईन ५० ते ६५ ह्या सोळांपैकीं कोणत्याही आइनाअन्वयें किंवा १७१ व्या आइनाअन्वयें ज्याबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार आहे असा कोणताही गुन्हा;

(ब) सदरहू कोर्ट भरणाऱ्या अमलदाराविरुद्ध कोणताही गुन्हा.

"आईन ९५.—(१) कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या कमांडिंग आफिसरानें भरलेल्या समरी कोर्टमार्शलास, मरणाची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची, किंवा एक वर्षाहून जास्त मुदतीच्या कैदेची शिक्षा खेरीज करून, ह्या आइनांअन्वयें ज्या कोणत्याही इतर शिक्षेचा ठराव करतां येईल तशा शिक्षेचा ठराव करण्याचा अधिकार आहे. समरी कोर्टमार्शलाचे अधिकार.

(२) दुसऱ्या कोणत्याही अमलदारानें भरलेल्या समरी कोर्टमार्शलास, मरणाची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची, किंवा सहा महिन्यांहून जास्त मुदतीच्या कैदेची शिक्षा खेरीज करून, ह्या आइनांअन्वयें ज्या कोणत्याही इतर शिक्षेचा ठराव करतां येईल तशा शिक्षेचा ठराव करण्याचा अधिकार आहे.

"आईन ९६.—समरी कोर्टमार्शलाचा ठराव व शिक्षेचा ठराव हे बहाल करण्याची जरुरी नसून, ते एकदम अमलांत आणण्याचा अधिकार आहे: समरी कोर्टमार्शलाचा ठराव [फाइंडिंग] व त्यानें केलेला शिक्षेचा ठराव.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं इन्साफ करणाऱ्या अमलदाराची झालेली चाकरी पांच वर्षांहून कमी मुदतीची असेल, तर त्यानें, मोहिमींत असल्या खेरीज, कोणताही शिक्षेचा ठराव, निदानपक्षीं कोराचा तावा असणाऱ्या वरिष्ठ लष्करी अमलदाराकडून मंजुरी मिळेपर्यंत, अमलांत आणतां कामा नये.

"आईन ९७.—दरेक समरी कोर्टमार्शलानें चालविलेलें काम, ज्या डिस्ट्रिक्टमध्यें किंवा ज्या डिव्हिजनमध्यें किंवा ब्रिगेडमध्यें इन्साफ झाला असेल त्याचा तावा असणाऱ्या अमलदाराकडे किंवा ठरविलेल्या अमलदाराकडे, विलंब न लावतां, रवाना केलें पाहिजे; आणि असा अमलदार किंवा इंडियाचे कमांडर-इन्-चीफ किंवा कमांडचा जनरल आफिसर याला, किंवा कमांडच्या दिमतींत नसणाऱ्या फौजेंत असें कोर्ट भरलें असे- चालविलेलें काम पाठवून देणें.

ल तेव्हां, अशा फौजेचा ताबा असणाऱ्या अमलदाराला, त्या खटल्याच्या गुणदोषांवरून, सदर्हू काम रद्द करण्याचा अधिकार आहे, मात्र तें केवळ सांकेतिक कारणांवरून रद्द करूं नये."

आईन १०० याच्याबदला नवीन आईन दाखल करणें.

३३. सदर्हू आईनांपैकीं आईन १०० याच्याबदला पुढील आईन दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:—

आरोपित मनुष्यास नजर कैदेंत किंवा कैदेंत ठेवणें.

"आईन १००.—(१) हे आईन लागू असणाऱ्या कोणा मनुष्यावर कोणत्याही गुन्ह्याचा आरोप आला असून त्याचा इन्साफ कोर्टमार्शल करून केला पाहिजे असें त्याच्या कमांडिंग आफिसरास किंवा इतर वरिष्ठ अमलदारास वाटेल तेव्हां त्यानें त्या आरोपित मनुष्याचा इन्साफ कोर्टमार्शलाकडून करतां येई तोंपर्यंत किंवा योग्य अधिकारी त्यास सोडी तोंपर्यंत त्यास लष्करी अटकेंत ठेवण्याविषयीं हूकूम केला पाहिजे.

(२) सदर्हू प्रकारच्या कोणत्याही मनुष्यास, न्यायाच्या कारणांकरितां जरूर असेल त्याहून जास्त वेळ लष्करी अटकेंत ठेवतां कामा नये."

आईन १०१ हा रद्द करणें.

३४. सदर्हू आइनांपैकीं आईन १०१ हा या कलमावरून रद्द केला असे.

आईन १०२ याच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३५. सदर्हू आइनांपैकीं आईन १०२ याच्या बदला पुढील आईन दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

दुभाषी.

"आईन १०२.—(१) दरेक कोर्टमार्शलास एक दुभाषी नेमला पाहिजे.

(२) ज्या ठाण्यांत किंवा जागेंत कोर्टमार्शल बसणार असेल तेथें लायक दुभाषी मिळत नसला, तर असें कोर्ट नेमणाऱ्या अमलदारानें, किंवा ज्या डिस्ट्रिक्टांत किंवा जागेंत इन्साफ व्हावयाचा असेल त्यांत ताबा असणाऱ्या अमलदारानें कोणत्याही लायक मनुष्यास दुभाष्याचें काम करण्यास नेमलें पाहिजे.

(३) दुसरा कोणी लायक मनुष्य मिळत नसेल तेव्हां, सुपरिंटेंडिंग आफिसरानें, किंवा युरोपियन अमलदारांचें कोर्ट केलेलें असेल तेव्हां, प्रेसिडेंटानें [अध्यक्षानें] दुभाष्याचें काम केलें पाहिजे.

(४) समरी कोर्टमार्शलाकडून होणाऱ्या इन्साफाच्या प्रसंगीं, इन्साफ करणाऱ्या अमलदारास, किंवा इन्साफाच्या वेळीं हजर असणाऱ्या अमलदारांपैकीं एका अमलदारास, दुसरा कोणताही लायक दुभाषी मिळत नसेल तर, दुभाष्याचें काम करण्याचा अधिकार आहे.

(५) कोणत्याही दुभाष्यास, दुभाषी या नात्यानें, कोणत्याही गोष्टींत मत देण्याचा अधिकार नाहीं.

आईन १०३ याच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३६. सदर्हू आइनांपैकीं आईन १०३ याच्या बदला पुढील आईन दाखल केले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें :—

कोर्टाचें विसर्जन.

"आईन १०३.—(१) कोर्टमार्शलांत निदान जितके अमलदार असणें या आइनांवरून जरूर आहे त्यांहून त्यांची संख्या इन्साफाच्या सुरुवातीनंतर कमी असेल, तेव्हां त्या कोर्टाचें विसर्जन झालें असें समजलें पाहिजे.

(२) जर ठराव होण्यापूर्वीं कैदी अजारी असल्याच्या सबबीनें, इन्साफ पुढें चालविणें अशक्य होईल, तर कोर्टमार्शलाचें विसर्जन केलें पाहिजे.

(३) ह्या आइनाअन्वयें जेव्हां कोर्टमार्शलाचें विसर्जन झालें असेल, तेव्हां कैद्याचा पुनः इन्साफ करण्याचा अधिकार आहे.

कोर्टांतून मनुष्यांस घालवून देण्याचा अधिकार.

"आईन १०३ अ.—कोर्टमार्शलाच्या प्रेसिडेंटास, त्याच्या मेंबरांमध्यें कोणत्याही गोष्टींचा विचार होण्याच्यावेळीं, दुसऱ्या सर्व मनुष्यांस कोर्टांतून घालवून देण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

"**आईन १०३ ब.**— सदरहू कोर्टास योग्य वाटेल तेव्हां कोणतीही जागा तपासून पाहण्याचा त्यास अधिकार आहे." जागा तपासून पाहण्याचा अधिकार.

३७. सदरहू आइनांपैकीं आईन १०४ याच्या बदला पुढील आईन दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :— आईन १०४ याच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

"**आईन १०४.** आईन ९६ किंवा ९७ याअन्वयें कोणतेंही कोर्टमार्शल युरोपियन सनदी अमलदारांचें बनविलें असेल, तेव्हां प्रेसिडेंटानें काम चालविलें पाहिजे." काम चालविणें.

३८. सदरहू आइनांपैकीं आईन १०७ यांत "कौन्सिलांतून झालेले हुकुमावरून कोर्टमार्शलें नेमलीं असतील तीं किंवा समरी कोर्टमार्शलें खेरीज करून इतर" या शब्दांच्या बदला "ऑर्डिनरी" हा शब्द दाखल केला पाहिजे. आईन १०७ याची सुधारणा.

३९. सदरहू आइनांपैकीं आईन १०८ याच्या नंतर पुढील आईन दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :— आईन १०८ यानंतर नवीन आईन दाखल करणें.

"**आईन १०८ अ.**—समरी कोर्टमार्शलांत दुभाष्यानें फक्त, 'अधिकारी प्रसिद्ध करी तोंपर्यंत मी उघड करणार नाहीं' या शब्दांपर्यंतच प्रतिज्ञा किंवा शपथ केली पाहिजे." दुभाष्याची प्रतिज्ञा किंवा शपथ.

४०. सदरहू आइनांपैकीं आईन ११४ हा या आइनावरून रद्द केला असे. आईन ११४ हा रद्द करणें.

४१. सदरहू आइनांपैकीं आईन ११६ याच्या बदला पुढील आईन दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :— आईन ११६ याच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

"**आईन ११६.**—(१) कोर्टमार्शलापुढें ज्या कैद्यावर चाकरी सोडून पळून गेल्याचा चार्ज ठेविला असेल त्याविषयीं, त्यानें चाकरी सोडून पळून जाण्याचा प्रयत्न केला असा किंवा रजेवांचून गैरहजीर राहिल असा ठराव करण्याचा अधिकार आहे. एका गुन्ह्याच्या चार्जावरून दुसऱ्या गुन्ह्याची शाबिती.

(२) कोर्टमार्शलापुढें ज्या कैद्यावर चाकरी सोडून पळून जाण्याचा प्रयत्न करण्याचा चार्ज ठेविला असेल त्याविषयीं, तो चाकरी सोडून पळून गेला असा किंवा रजेवांचून गैरहजीर राहिला असा ठराव करण्याचा अधिकार आहे.

(३) कोर्टमार्शलापुढें ज्या कैद्यावर पुढील गुन्ह्यांपैकीं, ह्मणजे चोरी, लबाडीनें मालाचा गैरशिस्त उपयोग करणें किंवा तो आपल्या कामाला घेणें, अन्यायानें विश्वासघात करणें, किंवा लबाडीनें चोरीचा माल घेणें किंवा ठेवणें, यांपैकीं कोणत्याही एकाद्या गुन्ह्याचा चार्ज ठेविला असेल त्याविषयीं, त्यानें त्या गुन्ह्यांपैकीं दुसरा कोणताही गुन्हा केला असा ठराव करण्याचा अधिकार आहे.

(४) कोर्टमार्शलापुढें ज्या कैद्यावर ह्या आइनांअन्वयें दुसऱ्या कोणत्याही गुन्ह्याचा चार्ज ठेविला असेल त्याविषयीं, विशेष कडक शिक्षा होण्याजोग्या स्थितींत केलेल्या कोणत्याही गुन्ह्याचा पुरावा होत नसेल तेव्हां, त्यानें तोच गुन्हा कमी कडक शिक्षा होण्याजोग्या स्थितींत केला असा ठराव करण्याचा अधिकार आहे."

४२. सदरहू आइनांपैकीं आईन ११७ याच्या बदला पुढील आईन दाखल केले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें :— आईन ११७ याच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

"**आईन ११७**—(१) हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याहि मनुष्यानें कोणताही लष्करी गुन्हा केल्याच्या शाबितीचा ठराव कोणतेंही कोर्टमार्शल करील, तेव्हां अशा कोर्टमार्शलानें, इतर कोणत्याही कोर्टमार्शलाकडून किंवा फौजदारी कोर्टाकडून त्या मनुष्याविषयीं पूर्वी गुन्ह्यांच्या शाबितीचे ठराव झालेले आहेत किंवा कसें यावाबद चौकशी केली पाहिजे, व त्यांबाबदचा पुरावा घेऊन दफ्तरांत दाखल केला पाहिजे, आणि त्या मनुष्याच्या आब्रूविषयीं चौकशी करून ती कशी आहे तें दफ्तरांत दाखल केलें पाहिजे. पूर्वी शाबीत झालेल्या गुन्ह्यांचा व आब्रूचा पुरावा.

ह्या आइनाअन्वयें पुरावा घ्यावयाचा तो, मुखजबानीनें, किंवा कोर्टमार्शलांच्या बुकांतील किंवा इतर सरकारी दफ्तरांतील मजकूर किंवा सहीसूद उतारे यांच्या रूपानें घेण्याचा अधिकार आहे; आणि अशा सहीसूद उताऱ्यांवरील सही शाबीत करणें जरूर नाहीं, तसेंच इनसाफ व्हावयाच्या मनुष्यास, त्याच्याविषयीं पूर्वीं झालेले गुन्ह्यांच्या शाबितीचे ठराव व त्याची आब्रू यांबाबद पुरावा घेण्यांत येईल अशी सूचना इनसाफापूर्वी देणेंही जरूर नाहीं.

(३) समरी कोर्टमार्शलांत इनसाफ करण्याऱ्या कमांडिंग आफिसरास योग्य वाटेल तर त्याला, गुन्हेगाराविरुद्ध पूर्वीं झालेले गुन्ह्याच्या शाबितीचे ठराव व त्याची आब्रू हीं ह्या आइनाच्या सदरील ठरावांअन्वयें शाबीत करून घेण्याच्या बदला, तीं आपल्या स्वतःच्याच माहितीवरून लिहून दफ़्तरीं दाखल करण्याचा अधिकार आहे.

पुराव्याबाबद सामान्य नियम.

"**आईन ११७ अ.**—वरील शेवटच्या आइनांतील ठरावांस अनुसरून, सन १८७२ चा हिंदुस्थानचा पुराव्याविषयीं आक्ट हा, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल त्यांत करावयाचे जे फेरफार व पुराव्याबाबद जे जास्त नियम जाहिरनामा प्रसिद्ध करून फर्मावितील त्यांस अनुसरून, कोर्टमार्शलापुढें चालणाऱ्या सर्व कामास लागू होईल असें समजावें."

आईन ११९ व १२० यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

४३. सदरहू आइनांपैकीं आईन ११९ व १२० यांच्या बदला पुढील आईन दाखल केले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें:—

मरणाच्या शिक्षेचा ठराव करण्यास जरूर असणारें बहुमत.

"**आईन ११९.**—कोणत्याही कोर्टमार्शलानें मरणाच्या शिक्षेचा ठराव, त्या कोर्टाच्या मेंबरांपैकीं निदान दोनतृतीयांशांच्या अनुमतावांचून, करतां कामा नये.

ठरावाची किंवा शिक्षेच्या ठरावाची तपासणी.

"**आईन १२०.**—(१) कोणत्याही कोर्टमार्शलानें चालविलेल्या कामाची व्यवस्था करण्याचा अधिकार असणाऱ्या अमलदाराच्या हुकुमावरून, अशा कोर्टानें केलेल्या ठरावाची किंवा शिक्षेच्या ठरावाची एकदां तपासणी करण्याचा अख्त्यार आहे, आणि अशा तपासणीच्यावेळीं त्या कोर्टास, त्यानें तसें फर्माविलें असतां, जास्त पुरावा घेण्याचा अधिकार आहे.

(२) तपासणीच्या वेळीं कोर्टांत अमलदार असावयाचे ते, असल फैसला झाल्यावेळीं जे हजीर होते तेच अमलदार हजीर असले पाहिजेत: मात्र त्यांपैकीं कोणी निरुपायामुळें गैरहजीर असला तर चालेल.

(३) सदरीं सांगितल्याप्रमाणें कोणताही अमलदार निरुपायामुळें गैरहजीर असला, तर त्याच्या गैरहजिरीचें कारण कोर्टाच्या कामांत योग्य सहीनिशीं दाखल केलें पाहिजे, आणि यानंतर त्या कोर्टांत ह्या आइनांवरून निदान जितके अमलदार असणें जरूर आहे तितके असल्यास, तपासणीच्या कामास लागलें पाहिजे."

आईन १२२ ते १२४ यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

४४. सदहू आइनांपैकीं आईन १२२ ते १२४ यांच्या बदला पुढील आईन दाखल केले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें :—

साक्षीदारांस समन करणें व दस्तऐवज हजर करणें.

"**आईन १२२.**—(१) जनरल कोर्टमार्शलाच्या बाबतींत जज्ज आडव्होकेटास आणि इतर कोणताही कोर्टमार्शलाच्या बाबतींत इनसाफ करण्याविषयीं हुकुम करणाऱ्या अमलदारास, आपल्या सहीनिशीं समन करून कोणत्याही मनुष्यास, साक्ष देण्याकरितां किंवा कोणताही दस्तऐवज किंवा इतर वस्तु हजर करण्याकरितां, समनांत सांगितल्यावेळीं व जागीं कोर्टापुढें हजर होण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

(२) साक्षीदार लष्करी अधिकाऱ्याच्या ताब्यांतला असेल तेव्हां, तो ज्या कोराचा, डिपार्टमेंटाचा किंवा डिव्याचमेंटाचा असेल त्याचा वास्तविक ताबा असणाऱ्या

अमलदाराकडे समन पाठविलें पाहिजे, आणि त्या अमलदारानें मग तें त्यावर बजाविलें पाहिजे.

(३) इतर कोणताही साक्षीदार असेल तेव्हां, तो ज्या माजिस्ट्रेटाच्या हुकुमतींत असेल किंवा राहत असेल त्या माजिस्ट्रेटाकडे समन पाठविलें पाहिजे, आणि अशा माजिस्ट्रेटानें त्या साक्षीदाराची आपल्याच कोर्टांत जरुरी असल्याप्रमाणें तें समन अमलांत आणलें पाहिजे.

(४) साक्षीदाराच्या कबजांतील किंवा ताब्यांतील कोणताही विशेष दस्तऐवज किंवा वस्तु हजर करण्याविषयीं त्यास फर्मोविलें असेल, तेव्हां त्या दस्तऐवजाचें किंवा वस्तूचें जितकें बरोबर वर्णन लिहितां येईल तितकें समनांत लिहिलें पाहिजे.

(५) या कलमांतील कोणत्याही ठरावावरून, सन १८७२ चा हिंदुस्थानचा पुराव्याविषयीं आक्ट, कलमें १२३ व १२४ यांस बाध येतो असें, किंवा तो ठराव टपाल किंवा तारायंत्र खात्याकडील अधिकाऱ्याच्या ताब्यांतील कोणतेंही पत्र, पोस्टकार्ड, तारेची बातमी किंवा इतर दस्तऐवज यास लागू होतो असें समजूं नये.

(६) जर सदहू अधिकाऱ्यांच्या ताब्यांतील कोणताही दस्तऐवज कोणत्याही कोर्टमार्शलाच्या कारणांकरितां जरूर आहे असें कोणत्याही डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटास, चीफ प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास, हाय् कोर्टास किंवा सेशन कोर्टास वाटेल, तर अशा माजिस्ट्रेटास किंवा कोर्टास, तो दस्तऐवज, तो माजिस्ट्रेट किंवा तें कोर्ट सांगेल तशा मनुष्याच्या स्वाधीन करण्याविषयीं प्रसंगाप्रमाणें टपाल किंवा तारायंत्र खात्याकडील अधिकाऱ्यांस फर्मोविण्याचा अख्त्यार आहे.

(७). जर सदरहू प्रकारचा कोणताही दस्तऐवज सदरहू प्रकारच्या कोणत्याही कारणाकरितां जरूर आहे असें कोणत्याहो इतर माजिस्ट्रेटास किंवा कोणत्याही पोलीस कमिशनरास किंवा पोलीसच्या डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास वाटेल, तर त्यास, टपाल किंवा तारायंत्र खात्याला, अशा दस्तऐवजाचा शोध करवून तो सदरहू कोणताही डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट, चीफ् प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट किंवा कोर्ट याचा हुकूम येई तोंपर्यंत ठेवून घेण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

कोर्टाची बेअदबी.

"**आईन १२३.**—(१) योग्य रीतीनें समन केलेला जो कोणताही साक्षीदार व जो कोणताही मनुष्य कोर्टमार्शलासमक्ष कोर्टाची कोणत्याही प्रकारें बेअदबी करील, किंवा आईन ६४, ७५ किंवा ७६ यांत सांगितलेला कोणताही गुन्हा करील त्यास हे आईन लागू असल्यास, तर त्यावर सदरहू कोर्ट फर्मावील त्याप्रमाणें काम चालविलें पाहिजे

(२) जर सदरहू प्रकारच्या कोणत्याही साक्षीदारास किंवा मनुष्यास हे आईन लागू नसतील, तर त्या कोर्टमार्शलाच्या प्रेसिडेंटास तो गुन्हा ज्या कोणत्याही माजिस्ट्रेटच्या हुकुमतीच्या स्थलसीमेंत केला त्या माजिस्ट्रेटच्या कोर्टास तो आपल्या सहीनिशीं लिहून पाठविण्याचा अधिकार आहे, आणि मग त्या माजिस्ट्रेटास तो खटला घेण्याचा, आणि आरोपित मनुष्याची जें कांहीं सांगण्याची इच्छा असेल तें ऐकून घेऊन त्या खटल्याचा निकाल सदरहू गुन्हा अशा माजिस्ट्रेटच्या कोर्टांत चाललेल्या कामांत केला असल्याप्रमाणें करण्याचा अधिकार आहे.

कोर्टमार्शलांत हजर होणाऱ्या मनुष्यांचे हक्क.

"**आईन १२४.**—(१) कोर्टमार्शलाचा कोणताही अध्यक्ष किंवा मेंबर, कोणताही जज्ज आड्व्होकेट किंवा सुपरिंटेंडिंग आफिसर, कोर्टमार्शलापुढें चालणाऱ्या कोणत्याही कामांतील कोणताही पक्षकार किंवा त्याचा वकील किंवा मुखत्यार, आणि कोर्टमार्शलापुढें हजर होण्याकरितां केलेल्या समनाबरहुकूम वागणारा कोणताही साक्षीदार हा, कोर्टमार्शलास जात असतांना, त्यांत हजर असतांना किंवा त्यापासून परत जातांना दिवाणी किंवा मुल्की प्रोसेसअन्वयें धरला जाण्यास पात्र होणार नाहीं असें समजावें.

(२) जर अशा कोणत्याही मनुष्यास अशा कोणत्याही प्रोसेसअन्वयें धरलें, तर त्यास विवक्षित कोर्टमार्शलाच्या हुकुमावरून सोडून देण्याचा अधिकार आहे."

आईन १२५ ते १२९ हे रद्द करणें.

४५. सदहू आईनांपैकीं आईन १२५ ते १२९ हे ह्यावरून रद्द केले आहेत.

आईन १३० ह्याची सुधारणा.

४६. आईन १३०, रकम (ड), वाक्य पहिलें, ह्यांत, "एक वर्षाहून" ह्या शब्दांच्या ऐवजीं "दोन वर्षांहून" हे शब्द दाखल करावे.

आईन १३१ ह्याच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

४७. सदहू आईनांपैकीं आईन १३१ ह्याच्या ऐवजीं खालील आईन दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

बर्तर्फी.

"आईन १३१.—कोर्टमार्शलानें ठरविलेल्या कोणत्याही शिक्षेबरोबर बर्तर्फीचीही शिक्षा ठरविण्याचा अधिकार आहे."

आईन १३२ ह्यांत नवीन शब्द दाखल करणें.

४८. सदहू आईनांपैकीं आईन १३२, ह्यांत, "दरजा कमी करून" ह्या शब्दांच्या ऐवजीं "दरजा कमी करण्याचा अगर" हे शब्द दाखल करावे.

आईन १३३ ते १३७ ह्यांऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

४९. सदहू आईनांपैकीं आईन १३३ ते १३७ ह्यांऐवजीं खालील आईन दाखल करावे: ते येणेंप्रमाणें:—

एकांत कैद.

"आईन १३३.—एकांत कैदेच्या शिक्षेचें कोणतेही ठरावावरून कोणत्याही मनुष्यास एकांत कैदेंत ठेवणें तें कोणत्याही बाबतींत एका खेपेस चवदा दिवसांहून अधिक ठेवूं नये; आणि अशा एकांत कैदेच्या मुदतींच्या दरम्यान, त्या मुदतींपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीचें अंतर ठेविलें पाहिजे. दिलेली शिक्षा तीन महिन्यांपेक्षां अधिक असेल तेव्हां, त्या दिलेल्या एकंदर शिक्षेपैकीं कोणत्याही एका महिन्यांतली एकांत कैदेची शिक्षा सात दिवसांपेक्षां जास्त नसावी, आणि अशा एकांत शिक्षेच्या मुदतींच्या दरम्यान त्या मुदतींपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीचें अंतर असावें.

दरजा कमी करून शिपाई करणें.

"आईन १३४.—ज्या कोणत्याही गैरसनदी अमलदाराला, आईन १३२ ह्याच्या दुसऱ्या पारिग्राफांत नमूद केलेल्या शिक्षांपैकीं कोणतीही शिक्षा कोर्टमार्शलाकडून केली जाईल, त्या अमलदाराचा दरजा कमी होऊन तो शिपाई झाला असें समजावें.

पगार व पेन्शन सरकारदाखल करणें.

"आईन १३५.—कोणत्याही गुन्ह्याची शाबिती झाली असतां, कोणत्याही जनरल, समरी जनरल, किंवा डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलास जी शिक्षा देण्याचा अधिकार आहे त्या शिक्षेखेरीज आणखी, गुन्हेगाराचे मागील चाकरीचे मुदतीवरून अगर प्रकारावरून जास्ती पगाराविषयीं आणि फांटा मिळाला असतां पेन्शनाचे हक्काविषयीं त्यास जो फायदा एऱ्हवीं असता तो सर्व अगदीं बुडविण्याची अगर सदहू प्रकारचा फायदा पूर्वीचे चाकरीपासून झालेला असो किंवा पुढें चाकरी करण्याबद्दल होणारा असो तो सर्व अगदीं बुडवण्याची अगर बढती, जास्त पगार किंवा पेन्शन किंवा इतर कोणतेंही ठरविलेलें कारण ह्यासाठीं लागू झालेली नोकरी बुडविण्याची अगर कोणताही लष्करी अलंकार किंवा इनाम सरकारदाखल करण्याची शिक्षा देण्याचा अधिकार आहे.

"आईन १३६.—हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्याविषयीं कोणत्याही कोर्टमार्शलानें गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केला असतां, त्याचा चांगल्या वर्तणुकीबद्दलचा पगार, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी आणवून वेळोवेळीं केलेल्या कानू व हुकुम लागू राहून, बंद होईल.

बढलेला पगार सरकारदाखल करणें.

"आईन १३७.—कोणत्याही गुन्ह्याची शाबिती होऊन गुन्हेगारास जर चाकरींतून बर्तर्फ करण्याचा ठराव करण्यांत आला, किंवा त्यास दिलेल्या शिक्षेंत बर्तर्फीची शिक्षा येत असली, तर, त्या कोर्टाला,

(अ) त्या गुन्हेगारास बर्तर्फ करण्याच्या वेळचा त्याचे पगाराचा व नेमणुकीचा चढलेला सगळा अगर कोणताही ऐवज किंवा त्यास सरकारांतून मिळणें असलेला सगळा अगर कोणताही पैका अगर

(ब) त्याचे वर्तणुकीमळें जो तोटा अगर नुकसानी झाल्याबद्दल शाबिती झाली असेल तो तोटा अगर नुकसानी भरून येण्यास जरूर लागेल तो सदर्हू ऐवजाचा अगर पैक्याचा अंश,

सरकारदाखल करण्याची आणखी शिक्षा करण्याचा अधिकार आहे."

आईन १३८ ह्याची सुधारणा.

९०. सदर्हू आईनांपैकीं आईन १३८ ह्याचा पहिला पारिग्राफ रद्द करावा.

आईन १३९ ह्याची सुधारणा

९१. सदर्हू आईनांपैकीं आईन १३९ ह्यांत, पहिल्या पारिग्राफांत, "तथापि अमलदाराचा" अशी सुरुवात होणाऱ्या व "कापण्याचा ठराव करूं नये" असा शेवट होणाऱ्या मजकुराच्या ऐवजीं, "तो, गुन्हेगाराच्या माहेवारी पगाराच्या व नेमणुकांच्या अर्ध्याहून अधिक कापण्याचा ठराव करूं नये" हा मजकुर दाखल करावा.

आईन १४२ ते १५० हे रद्द करणें.

९२. सदर्हू आईनांपैकीं आईन १४२ ते १५० हे ह्यावरून रद्द केले आहेत.

आईन १५१ ह्याची सुधारणा.

९३. सदर्हू आईनांपैकीं आईन १५१ ह्यांत, "अगदीं जवळचा तुरुंग" ह्या शब्दांच्या बदला "तुरुंग" हा शब्द दाखल करावा.

सदर्हू आईनांत जास्त मजकूर दाखल करणें.

९४. सदरीं शेवटीं उल्लेख केलेल्या आईनाच्या शेवटीं खालीं लिहिलेला विशेष ठराव जास्त दाखल करावा, येणेंप्रमाणें:—

"मात्र इतकेंच कीं, तीन महिन्यांपेक्षां जास्त नाहीं इतक्या मुदतीची सदर्हू प्रकारच्या कैदेची शिक्षा ठरविण्यांत आली तर, बाहाल करणाऱ्या अगर वरिष्ठ अमलदारास, अगर समरी कोर्टमार्शलच्या बाबतींत तो इन्साफ करणाऱ्या कमांडिंग आफिसरास, ती शिक्षा लष्करी अटकेंत भोगण्यांत यावी असें फर्माविण्याचा अख्त्यार आहे."

आईन १५२ ह्याची सुधारणा.

९५. सदर्हू आईनांपैकीं आईन १५२ ह्यांत, "नेण्याविषयीं हुकुम करण्याचा अधिकार" ह्या शब्दांनंतर "इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्याच्या निर्बंधास पात्र राहून" हे शब्द दाखल करावे, आणि "कोणतेही इलाक्याचे कमांडर इन् चीफास आहे" ह्या शब्दांच्या ऐवजीं "कमांडच्या जनरल आफिसरास आहे" हे शब्द दाखल करावे.

सदर्हू आईनाची आणखी सुधारणा.

९६. सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनाच्या दुसऱ्या पारिग्राफाच्या प्रारंभीं, "सदर्हू निर्बंधास पात्र राहून," हे शब्द दाखल करावे.

आईन १५५ ह्यांत नवीन शब्द दाखल करणें.

९७. सदर्हू आईनांपैकीं आईन १५५ ह्यांत, "झाला त्या तारखेपासून" ह्या शब्दांनंतर "किंवा अशा शिक्षेच्या ठरावावर अपील करण्यांत येऊन तें नामंजूर झालें असेल तर त्या अपिलाच्या निकालाच्या तारखेपासून" हा मजकुर दाखल करावा.

सदर्हू आईनांत जास्त मजकूर दाखल करणें.

९८. सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनांत खालील जास्त मजकूर दाखल करावा: तो येणें प्रमाणें:—

"मात्र, असा कोणताही मनुष्य मोहिमीवर असेल तेव्हां त्यास, त्या इन्साफाचें प्रोसीडिंग बाहाल करण्यास किंवा त्याची इतर रीतीनें व्यवस्था करण्यास ह्या आईनांअन्वयें अधिकार दिलेल्या अमलदाराच्या हुकुमाअन्वयें रांकेमध्यें चाकरीवर राहूं देण्याचा अधिकार आहे, आणि अशा रांकेमध्यें त्याची जी चाकरी होइल, ती त्याच्या काळे पाण्याच्या शिक्षेच्या अगर कैदेच्या शिक्षेच्या मुदतीचा भाग ह्मणून गणली जाईल."

आईन १५६ ते १५९ हे रद्द करणें.

९९. सदर्हू आईनांपैकीं आईन १५६ ते १५९ हे ह्यावरून रद्द केले आहेत.

आईन १६० ह्याच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

६०. सदर्हू आईनांपैकीं आईन १६० ह्याच्याबदला खालील आईन दाखल करावा; तो येणेंप्रमाणः—

क्षमा करणें व शिक्षा कमी करणें.

"आईन १६०.—हे आईन लागू असणारे कोणत्याही मनुष्याविषयीं कोणत्याही कोर्टमार्शलाकडून कोणत्याही गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केला जाईल तेव्हां,

(अ) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, अगर,

(ब) त्या मनुष्यावर सिव्हिल गुन्ह्याव्यतिरिक्त इतर कोणताही गुन्हा ठरविला असेल तेव्हां इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांस किंवा कमांडच्या जनरल आफिसरास,

(१) त्या मनुष्यास क्षमा करण्याचा,

(२) त्यास दिलेली शिक्षा सगळी अगर अंशतः कमी करण्याचा,

(३) त्या मनुष्याची जी चाकरी अगर इतर फायदा त्याच्या शिक्षेच्या ठरावावरून बुडालेला असेल ती चाकरी अगर तो फायदा त्यास परत देण्याबद्दल हुकुम करण्याचा, अगर

(४) त्याला चाकरीवरून बर्तर्फ केलें असल्यास त्याला त्या चाकरीवर पुनः लावण्याचा

अधिकार आहे;

मात्र, कमांडच्या जनरल आफिसरानें, कोणत्याही मनुष्याची खालीं सांगितल्याप्रमाणें हकीकत असल्याशिवाय, म्हणजे—

(१) त्या मनुष्यास शिक्षा करण्यांत आली तेव्हां, तो त्या जनरल आफिसराच्या अधिकारांत होता असें असल्याशिवाय, आणि

(२) तो मनुष्य त्या वेळ पर्यंत चाकरी करीत असल्याशिवाय, किंवा त्यास चाकरीतून बर्तर्फ केलेलें असल्यास, त्यास ज्या कोरांतून किंवा डिपार्टमेंटांतून बर्तर्फ केलें तें कोर किंवा डिपार्टमेंट त्या आफिसराच्या अधिकाराखालीं त्या वेळपर्यंत राहिलेलें असल्याशिवाय,

ह्या कलमांत सांगितलेले अधिकार त्या मनुष्याच्या संबंधानें चालवूं नयेत.

आईन १६१ ह्याची सुधारणा.

६१. सदहू आईनां पैकीं आईन १६१ ह्यांतले "किंवा मद्रास सरकारचे किंवा मुंबई सरकारचे" हे शब्द रद्द करावे, आणि "कोणतेही इलाक्याचे कम्यांडर इन् चीफाचे सहीची अथवा कोणतेही इलाक्याचे दिमतीस नसणारे फौजेचे किंवा" ह्या मजकुराच्या बदला, "इंडियाचे कमांडर इन् चीफचे, किंवा कमांडचे जनरल आफिसराचे किंवा कोणतेही कमांडचे दिमतीस नसणारे कोणत्याही फौजेच्या कमांडिंग आफिसराचे किंवा कोणत्याही" हा मजकुर दाखल करावा.

आईन १६१ याच्यानंतर एक नवीन आईन दाखल करणें.

६२. सदहू आईनांपैकीं आईन ६१ ह्याच्या नंतर खालील आईन दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

"प्रोसीडिंग राखून ठेवणें.

कोर्ट मार्शलांचीं प्रोसीडिंग राखून ठेवणें.

"आईन १६१ अ.—(१) सर्व जनरल कोर्टमार्शलांचीं प्रोसीडिंग जज्ज ॲड्व्होकेट जनरलानें सात वर्षांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत राखून ठेविलीं पाहिजेत, आणि समरी जनरल कोर्टमार्शलांचीं आणि डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलांचीं प्रोसीडिंग, ठराव व शिक्षेचा ठराव ह्यांच्या बाहालीच्या तारखेपासून तीन वर्षांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत राखून ठेविलीं पाहिजेत.

(२) रेजिमेंटल व समरी कोर्टमार्शलाचीं प्रोसीडिंग, कैदी ज्या कोरांतला अगर डिपार्टमेंटांतला असामी होता त्या कोराच्या अगर डिपार्टमेंटाच्या दप्तराबरोबर, तीन वर्षेंपर्यंत राखून ठेविलीं पाहिजेत.

(३) कोणत्याही कोर्टमार्शलाकडून इन्साफ झालेल्या कोणत्याही मनुष्यानें, ठराव व शिक्षेचा ठराव बाहाल होणें जरूर असेल त्या बाबतींत तशी बाहाली मिळाल्यानंतर आणि प्रोसीडिंगांचा नाश केला जाण्याच्या आधीं कोणत्याही वेळीं त्या प्रोसीडिंगांची व तपासणीचीं प्रोसीडिंगें असण्यास त्यांची नकल मागितल्यास ती, त्याला, त्यानें त्या नकले बद्दल ठरीव दराप्रमाणें पैसा दिला असतां त्या प्रोसीडिंगांचा कबजा असणाऱ्या अमलदाराकडून अगर मनुष्याकडून मिळाली पाहिजे."

आईन १६२ ह्याच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

६३. सदहू आईनां पैकीं आईन १६२ ह्याच्याबदला खालील आईन दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

आईन लागू असणारा मनुष्य गैरहजर राहिला असतां त्याबद्दल चौकशी.

"आईन १६२.—(१) हे आईन लागू असणारा कोणी मनुष्य योग्य हुकुमावांचून आपल्या कामावरून साठ दिवस पर्यंत गैर हजीर राहील तर, एक कोर्ट आफ् इनक्वैरी साधेल तितकें लवकर भरावें, आणि त्या कोर्टानें, ठरींव रीतीप्रमाणें दिलेल्या प्रतिज्ञेवर अगर शपथेवर, त्या मनुष्याच्या गैरहजिरीच्या संबंधानें, आणि त्याच्या स्वाधीन केलेली होती अशा सरकारी मिळकतींत कांहीं तूट आलेली असल्यास त्या तुटीच्या संबंधानें, किंवा त्याच्या हत्यारांत, युद्धसामुग्रींत, सरंजामांत, यंत्रांत, कपड्यांत अगर जरूरीच्या जिन्नसांत कांहीं तूट आलेली असल्यास त्या तुटीच्या संबंधानें, चौकशी करावी आणि तो मनुष्य योग्य हुकुमावांचून अगर इतर पुरेशा कारणावांचून गैरहजर राहिल्याबद्दल त्या कोर्टाची खातरी झाल्यास त्या कोर्टानें तो मनुष्य त्याप्रमाणें गैरहजर राहिला असें ठरवावें, व किती दिवस गैरहजर राहिला तें ठरवावें, आणि सदरील तूट दिसून आली असल्यास ती ठरवावी; आणि तो मनुष्य ज्या कोरांतला अगर डिपार्टमेंटांतला असेल त्या कोराच्या अगर डिपार्टमेंटाच्या कमांडिंग आफिसरानें सदहू ठराव त्या कोराच्या अगर डिपार्टमेंटांच्या कोर्टमार्शल बुकांत लिहून ठेवावा.

(२) गैरहजीर ह्मणून ठराव झालेला मनुष्य नंतर स्वतः येऊन हजीर न होईल किंवा धरण्यांत न येईल तर, सदहूप्रमाणें मजकूर लिहून ठेविला असेल तो, चाकरी सोडून पळून गेल्याचे गुन्ह्याचे शाबितीचे ठरावाप्रमाणें कायदेशीर ठराव आहे असें समजावें.

(३) गैरहजीर ह्मणून ठराव झालेला मनुष्य स्वतः होऊन हजीर होईल किंवा धरण्यांत येईल तर, त्या मनुष्याचा चाकरी सोडून पळून गेल्याबद्दलचा इन्साफ होईल त्या वेळीं, कोर्टमार्शल बुक ज्या अमलदाराचे स्वाधीन असेल त्याचे सहीचा ह्मणून असलेला सदहू प्रमाणें लिहून ठेविलेला मजकूर अगर तशी त्याची नकल, त्यांत लिहिलेल्या गोष्टींविषयीं, अनुमानिक पुरावा आहे असें समजलें जाईल; आणि त्यांत सांगितलेला मनुष्य व कैदी हे दोन्ही एकच आहेत असें शाबित झालें ह्मणजे चाकरी सोडून पळून जाण्याचा गुन्हा केल्याची व त्या मजकुरांत लिहून ठेविलेली तूट आणण्याचा गुन्हा केल्याची त्यावर शाबिती करण्याचा अधिकार आहे."

आईन १६३ याची सुधारणा.

६४. सदहू आईनांपैकीं आईन १६३ ह्याच्या शेवटच्या पारिग्राफाऐवजीं खालील मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"सदहू प्रकारची शिफारस हिंदुस्थानचे कमांडर इन् चीफ ह्यांनीं योग्यरीतीनें बाहाल केली असतां किंवा कमांडच्या जनरल आफिसरानें किंवा सदहू मनुष्य ज्या कमांडमधला असेल त्या कमांडच्या दिमतीस नसलेल्या कोणत्याही फौजेचा ताबा असणाऱ्या अमलदारानें योग्यरीतीनें बाहाल केली असतां किंवा सदहू मनुष्य ज्या कोणत्याही जनरल आफिसराच्या कमांडखालीं चाकरी करीत असेल त्या आफिसरानें योग्यरीतीनें बाहाल केली असतां त्या मनुष्यास त्या शिफारसीप्रमाणें, सदहू प्रकारचा चढलेला पैका मिळण्याविषयीं व चाकरी जमेस धरली जाण्याविषयीं हक्क प्राप्त होईल."

आईन १६४ याच्या ऐवजी नवीन आईन दाखल करणें.

६५. सदहू आईनांपैकीं आईन १६४ ह्याच्याऐवजीं खालील आईन दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

दरज्या कमीकरणें अगर शिपायी करणें.

"आईन १६४.—इंडियाचे कमांडर इन् चीफ, कमांडचा जनरल आफिसर, कोणत्याही कमांडच्या दिमतीस नसलेल्या कोणत्याही फौजेचा ताबा असणारा अमलदार आणि कोणत्याही डिस्ट्रिक्टचा, डिव्हिजनचा अगर ब्रिगेडचा ताबा असणारा अमलदार, ह्यास, आपआपल्या कमांडमधील कोणत्याही गैरसनदी अमलदाराचा दरज्या कमीकरण्याचा अगर त्यास शिपायी करण्याचा अधिकार आहे."

आईन १६५ ह्याची सुधारणा.

६६. सदहू आईनांपैकीं आईन १६५ ह्यांत, "सदहू प्रकारची हलकी शिक्षा कोर्टमार्शलानें ठरवूं नये. आणि" हे शब्द, "प्रसंगा प्रमाणें" हे शब्द, "किंवा इलाक्याचे कम्यांडर इन् चीफाचे" हे शब्द. आणि "कोणतेही शिपायावर कोर्टमार्शलानें गुन्हा ठरविला ह्मणजे त्याचे चांगले वर्तणुकीचा पगार बंद होईल" हे शब्द रद्द करावे; आणि "कम्यांडिंग आफिसराचे हुकुमावरून किंवा कोर्टमार्शलानें केलेले शिक्षेचे ठरावावरून" ह्या शब्दांच्या बदला "कम्यांडिंग आफिसराचे हुकुमावरून" हे शब्द दाखल करावे.

आईन १६६ ह्याची सुधारणा.

६७. सदहू आईनांपैकीं आईन १६६ ह्यांत. "किंवा मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिलांनीं किंवा मुंबईचे गवरनर इन् कौन्सिलांनीं किंवा इतर कोणतेही इलाक्याचे सरकारानें" हे शब्द रद्द करावे.

आईन १६८ ह्याची सुधारणा.

६८. सदहू आईनांपैकीं आईन १६८ ह्यांत "प्रेसिडेन्सीचे कम्यांडर इन् चीफानें" ह्या शब्दांच्या ऐवजीं "इंडियाचे कमांडर इन् चीफानें किंवा कमांडच्या जनरल आफिसरानें" हे शब्द दाखल करावे.

आईन १६९ ह्याची सुधारणा.

६९. सदहू आईनांपैकीं आईन १६९ ह्यांत, दुसऱ्या पारिग्राफांत, "वारंट आफिसराचे" ह्या शब्दांच्या ऐवजीं "गैर सनदी अमलदाराचे" हे शब्द दाखल करावे.

आईन १७० ह्याचा एक भाग रद्द करणें.

७०. सदहू आईनांपैकीं आईन १७० ह्याचा दुसरा पारिग्राफ व तिसरा पारिग्राफ हे ह्यावरून रद्द केले आहेत.

आईन १७१ ते १७५ ह्याच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

७१. सदहू आईनांपैकीं आईन १७१ ते १७९ ह्यांच्या बदला खालील आईन दाखल करावे: ते येणेप्रमाणें :—

"सिव्हिल गुन्हे.

सिव्हिल गुन्ह्यांच्या संबंधानें लष्करी हुकुमत.

"आईन १७१.—हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्यानें ब्रिटिश इंडियाबाहेरील कोणत्याही जागीं कोणताही सिव्हिल गुन्हा केला तर त्यानें लष्करी कायद्याविरुद्ध गुन्हा केला असें समजलें जाईल, आणि तो गुन्हा केल्याबद्दल त्यावर ह्या आईनाअन्वयें आरोप आणिल्यास. ह्या आईनांतले ठराव लागू राहून, तो त्या गुन्ह्याबद्दल ब्रिटिश इंडियांतल्या किंवा ब्रिटिश इंडिया बाहेरच्या कोणत्याही जागीं कोर्टमार्शलाकडून इन्साफ केला जाण्यास आणि शाबिती झाल्यास खालीलप्रमाणें शिक्षा केली जाण्यास पात्र होईल :—

(अ) हा गुन्हा जर, ज्या गुन्ह्याबद्दल ब्रिटिश इंडियांतील कायद्याअन्वयें मरणाची किंवा काळे पाण्याची किंवा तीन वर्षांपेक्षां जास्त मुदतीच्या कैदेची शिक्षा देतां येते तसा गुन्हा असला, तर तो मनुष्य त्या अपराधाबद्दल ब्रिटिश इंडियांतील कायद्यांत सांगितलेली कोणतीहि शिक्षा भोगण्यास पात्र होईल; आणि

(ब) इतर बाबतींत, तो मनुष्य, त्या अपराधाबद्दल ब्रिटिश इंडियांतील कायद्यांत सांगितलेली जी कोणतीहि शिक्षा किंवा सुव्यवस्था व लष्करी शिस्त ह्यांस बाध येणारें कृत्य करण्याबद्दल ह्या आईनांअन्वयें जी कोणतीहि शिक्षा त्यास दिली जाईल, ती भोगण्यास पात्र होईल.

आईन १७१ हा विवक्षित सिव्हिल गुन्ह्यांस लागू करणें.

"आईन १७२.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, जाहिरनामा देऊन, सदरील शेवटला आईन, हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याहि मनुष्यानें ब्रिटिश

हिंदुस्थानांत मोहिमीवर असतांना केलेल्या सर्व सिव्हिल गुन्ह्यांस अगर कोणत्याहि वर्गाच्या सिव्हिल गुन्ह्यांस लागू करण्याचा आणि तो जाहिरनामा रद्द करण्याचा अधिकार आहे.

विवक्षित गुन्ह्यांचा इन्साफ लष्करी कायद्याअन्वयें केव्हां करावयाचा तें.

"आईन १७३.—हे आईन लागू असणारा जो कोणताहि मनुष्य, ब्रिटिश इंडियांत किंवा ब्रिटिश इंडियाबाहेर, लष्करी कायदा लागू असणाऱ्या कोणत्याहि मनुष्याविरुद्ध खून, सदोष मनुष्यवध, अगर हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा, कलमें २२३ ते ३३९ (दोन्ही धरून) ह्यांपैकीं कोणत्याहि कलमाअन्वयें किंवा कलम ९०६ ह्याअन्वयें शिक्षा देतां येणारा गुन्हा ह्यांपैकीं कोणताहि गुन्हा करील, किंवा करण्याचा प्रयत्न करील, किंवा करण्यास साह्य करील, त्या मनुष्यानें लष्करी कायद्याविरुद्ध गुन्हा केला असें समजलें जाईल; आणि असा कोणताही गुन्हा केल्याबद्दल त्यावर ह्या आईनाअन्वयें आरोप आणिल्यास, ह्या आईनांचे ठराव लागू राहून, तो त्या गुन्ह्याबद्दल ब्रिटिश इंडियांतल्या किंवा ब्रिटिश इंडिया बाहेरील कोणत्याहि जागीं कोर्टमार्शलाकडून इन्साफ केला जाण्यास, आणि शाबिती झाल्यास हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्यांत त्या गुन्ह्यास सांगितलेली शिक्षा भोगण्यास, पात्र होईल.

विवक्षित गुन्ह्यांवर हुकुमत.

"आईन १७४.—जेव्हां सदरील आईनांपैकीं कोणत्याहिं आईनाअन्वयें, कोणत्याहि गुन्ह्यासंबंधानें एकादें फौजदारी कोर्ट व एकादें कोर्टमार्शल ह्या दोघांसही हुकुमत असेल, तेव्हां, त्या गुन्ह्यासंबंधाचें काम कोणत्या कोर्टापुढें चालावयाचें तें ठरविणें, ठरविलेल्या लष्करी अधिकाऱ्याच्या नजरेवर आहे. आणि तें काम कोर्टमार्शलापुढें चाललें पाहिजे असें त्या अधिकाऱ्यानें ठरविलें, तर त्या अधिकाऱ्यास, आरोपितास लष्करी अटकेंत ठेवण्याबद्दल हुकुम करण्याचा अधिकार आहे.

गुन्हेगारास स्वाधीन करण्यास फर्माविण्याचा फौजदारी कोर्टाचा अधिकार.

"आईन १७५.—(१) घडला ह्मणून ह्मणणें असलेल्या कोणत्याहि गुन्ह्याच्या संबंधाचें काम आपणापुढें चाललें पाहिजे असा हुकुमत असणाऱ्या फौजदारी कोर्टाचा अभिप्राय असेल तेव्हां त्या कोर्टास कोर्टमार्शल भरविणाऱ्या अधिकाऱ्याला किंवा ठरविलेल्या अधिकाऱ्याला लेखी नोटीस देऊन असें फर्मावण्याचा अधिकार आहे कीं, त्यानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, गुन्हेगारावर कायद्याप्रमाणें काम चालविण्यासाठीं त्यास सर्वांत जवळच्या माजिस्ट्रेटाच्या स्वाधीन करावें किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांकडे करावयाच्या इतल्याचा निकाल येई तों पर्यंत काम तहकूब ठेवावें.

(२) अशा प्रत्येक प्रसंगीं सदर्हू अधिकाऱ्यानें सदर्हू नोटिशीबरहुकूम त्या गुन्हेगारास स्वाधीन करावें, किंवा त्या गुन्हेगारासंबंधाचें काम कोणत्या कोर्टापुढें चालावयाचें ह्या प्रश्नाचा निकाल करण्याठीं तो गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांकडे ताबडतोब पाठवावा: अशा प्रश्नाचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांकडून जो निकाल करण्यांत येईल तो अखेरचा समजला जाईल."

आईन १७६ ते १७९ ह्यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

७२. सदर्हू आईनांपैकीं आईन १७६ ते १७९ ह्यांच्या ऐवजीं खालील आईन दाखल करावेः येणेंप्रमाणें :—

"सदर ६. मयत मनुष्यांचा व चाकरी सोडून पळून गेलेल्यांचा माल.

मयत मनुष्यांचा, चाकरी सोडून पळून गेलेल्या मनुष्यांचा व वेड्या मनुष्यांचा माल.

"आईन १७६.—हे आईन लागू असणाऱ्या वर्गांपैकीं असलेला जो कोणताहि मनुष्य मरेल, लढाईंत मारला जाईल, अगर चाकरी सोडून पळून जाईल, त्याच्या मालाची व्यवस्था करण्यासंबंधानें खालील कानू केल्या आहेत :—

(१) कमांडिंग आफिसरानें त्या जागीं असलेला सगळा जंगम माल स्वाधीन करून घ्यावा, त्याची एक यादी करवावी, आणि त्या मयताचा अगर चाकरी सोडून पळून गेलेल्याचा येथें असलेला कोणताही पगार व नेमणुका घ्याव्यां.

(२) ज्या मयत मनुष्याच्या नांवें कोणत्याही सरकारी सेव्हिंगव्यांकेमध्यें (ह्यांत कोणत्याही नांवाच्या कोणत्याही पोस्टल सेव्हिंग ब्यांकेचा समावेश होतो असें समजावें) एक हजार रुपयांपेक्षां जास्त नाहीं इतकी अमानत रकम असेल, त्याच्या बाबतींत कमांडिंग आफिसरास योग्य वाटल्यास त्यानें, खात्याच्या कानूंत कांहींही असलें तरी ती अमानत रकम आपणास ताबडतोब देण्यांत यावी अशी त्या ब्यांकेच्या सेक्रेटरीस किंवा इतर योग्य अमलदारास मागणी करावी; आणि ह्या मागणीअन्वयें ती अमानत रकम देण्यांत आली ह्मणजे, ह्यानंतर ठरविण्यांत आलें आहे त्याशिवाय इतर कोणत्याही रीतीनें त्या रकमेवर कोणत्याही मनुष्याचा हक्क चालणार नाहीं.

(३) ज्या मयत मनुष्याचा वारसा त्या जागीं असून त्यानें, त्या मयताचीं पलटणीं-तलीं कर्जें असल्यास तीं देऊन टाकण्याचा जामीन दिलेला असेल, त्या मयत मनुष्याच्या बाबतींत, कमांडिंग आफिसरानें, सदर्हू माल आणि ह्या आइनाची रकम (२) ही अन्वयें घेतलेली ब्यांकेंतली अमानतीची रकम, हीं, त्या वारसाच्या स्वाधीन केलीं पाहिजेत.

(४) ज्या मयत मनुष्याच्या मालाची व्यवस्था ह्या आईनाच्या (३) ऱ्या रकमे-अन्वयें करण्यांत आलेली नसेल त्या मयत मनुष्याच्या बाबतींत, आणि कोणत्याही चा-करी सोडून पळून गेलेल्या मनुष्याच्या बाबतींत, कमांडिंग आफिसरानें तो माल सार्व-जनिक लिलावानें विकवावा, आणि त्या लिलावाच्या उत्पन्नांतून व ह्या आईनाच्या (२) ऱ्या रकमेअन्वयें कांहीं अमानतीची रकम घेतलेली असल्यास तींतून, पलटणींसंबंधीं कर्जें असल्यास तीं आणि कापांतलीं किंवा छावणींतलीं इतर कर्जें असल्यास तीं देऊन टाकावीं आणि मयत मनुष्याच्या बाबतींत त्याच्या मर्तिकाच्या संबंधाचा खर्च द्यावा.

(५) कांहीं शिलक राहिल्यास ती, मयत मनुष्याच्या बाबतींत, त्याचा वारसा असल्यास त्यास आदा करावी, अगर, त्या मनुष्याच्या मृत्यूनंतर बारा महिन्यांच्या आंत त्या शिलकेवर कोणाचाही हक्क स्थापित न झाल्यास, ठरविलेल्या अमलदाराकडे पाठवून द्यावी.

(६) चाकरी सोडून पळून गेलेल्या मनुष्याच्या बाबतींत, कमांडिंग आफिसरा-च्या हातीं राहिलेली रकम, ठरविलेल्या अमलदाराकडे ताबडतोब पाठवून द्यावी.

प्रोबेट इत्यादि हजर केल्या-शिवाय विवक्षित मालाची व्यव-स्था करणें.

" आईन १७७.—कोणत्याही मयत मनुष्याच्या वारसास गेल्या शेवटल्या आईना-अन्वयें स्वाधीन करावयाचा माल व द्यावयाचा पैसा, त्याची एकंदर किंमत किंवा रकम एक हजार रुपयांपेक्षां जास्त नसल्यास व ठरविलेल्या अमलदारास योग्य वाटल्यास, त्या अमलदारास जो कोणताही मनुष्य तो माल व पैसा घेण्यास अगर मयताच्या एस्टेटीची वहिवाट करण्यास हक्कदार आहे असें वाटेल, त्याला, त्यानें प्रोबेट, वहिवाट चालविण्या-विषयींची सनद, सर्टिफिकेट किंवा ह्या प्रकारचा हक्काचा इतर खात्रीलायक पुरावा हजर केल्याशिवाय, स्वाधीन करण्याचा व आदा करण्याचा अधिकार आहे; आणि ह्याप्रमाणें स्वा-धीन केल्यानें व आदा केल्यानें, तसें करण्याचा हुकुम करणारे आणि हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ स्टेट इन् कौन्सिल हे त्या मालाच्या अगर पैक्याच्या संबंधाच्या पुढच्या सर्व जबाबदा-रींतून पूर्णपणें मुक्त होतील असें समजावें; परंतु ह्या आईनांत कांहींही असलें तरी, सदर्हू प्रमाणें ज्या कोणत्याही मनुष्यास माल स्वाधीन केलेला असेल अगर पैसा आदा केलेला असेल त्या मनुष्यावरील मयत मनुष्याच्या कोणत्याही मृत्युपत्र चालविणाऱ्याच्या अगर वहिवाटदाराच्या अगर इतर वारस्याच्या अगर कोणत्याही धनकोच्या हक्कांस बाध येतो असें समजूं नये.

आईन १७६ ह्यांत चाकरी-सोडून पळून जाणें ह्या संज्ञेचा अर्थ.

"आईन १७८.—ज्या कोणत्याही मनुष्याविषयीं चाकरी सोडून पळून गेल्याचा शाबितीचा ठराव झालेला असेल अगर जो कोणताही मनुष्य आपल्या कामावरून साठ दिवसपर्यंत बेकायदेशीर रीतीनें गैरहजर राहून तदनंतर स्वाधीन झालेला अगर धर-

लेला नसेल, तो मनुष्य आईन १७६ ह्याच्या अर्थाअन्वयें, चाकरी सोडून पळून गेला असें समजलें पाहिजे.

"आईन १७९.—सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनाचे ठराव, लागू करतां येतील तेथवर, हे आईन लागू असणारा कोणताही मनुष्य वेडा झाल्यास लागू केले पाहिजेत, आणि सन १८७७ चा लष्करी वेड्या मनुष्यांविषयीं आक्ट ह्यांत अधिकार दिल्याप्रमाणें त्याच्या पोषणासाठीं नेमणूक करून दिली पाहिजे. आईन १७८ वेड्यांस लागू करणें.

७३. सदहू आईनांपैकीं भाग ३ ह्यांच्या ऐवजीं खालील भाग दाखल करावाः तो येणेंप्रमाणें :— भाग ३ ह्याच्या बदला नवीन भाग दाखल करणें.

"भाग ३. किरकोळ.

"आईन १८०.—हे आईन लागू असणारे ज्या कोणतेही मनुष्यावरील गुन्हा कोणत्याही कोर्ट-मार्शलानें, अगर फौजदारी कोर्टानें उडविला असेल किंवा ठरविला असेल, किंवा तशा ज्या कोणत्याही मनुष्याचा इन्साफ आईन १६९ अगर १६६ अन्वयें संक्षिप्त रीतीनें केला असेल, तो मनुष्य त्याच गुन्ह्याबद्दल कोणत्याही कोर्टमार्शलाकडून इन्साफ केला जाण्यास किंवा सदहू आईनांपैकीं कोणत्याही आईनाअन्वयें संक्षिप्त रीतीनें इन्साफ केला जाण्यास पात्र होणार नाहीं. पुनः इन्साफ करण्याची मनाई.

"आईन १८१.—(१) हे आईन लागू असणारा कोणताही मनुष्य, तो मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्करापैकीं असे तोंपर्यंत, कोणत्याही सिव्हिल अगर रेव्हेन्यू कोर्टानें अगर त्या कोर्टाच्या अधिकाराअन्वयें किंवा कोणत्याही मुलकी अमलदारानें किंवा त्याच्या अधिकाराअन्वयें काढिलेल्या प्रोसेसीवरून कर्जाबद्दल धरला जाण्यास पात्र नाहीं असें समजावें. कर्जाबद्दल धरलें जाण्याची माफी.

(२) अशा कोणत्याही कोर्टाच्या जज्जास, अशा कोणत्याही मनुष्यानें अगर त्याच्या वरिष्ठ अमलदारानें त्या मनुष्यास ह्या आईनांतील ठरावांविरुद्ध धरल्याबद्दल कोणतीही फिर्याद केली असतां तिच्याबद्दल चौकशी करण्याचा, आणि आपल्या सहीच्या वारंटानें त्या मनुष्यास सोडून फिर्यादीस वाजवी खर्च देण्याबद्दल ठराव करण्याचा अधिकार आहे; आणि हा खर्च, सदहू प्रोसेस मिळविणाऱ्या मनुष्यावर झालेल्या हुकुमनाम्यांत फिर्यादीस जर खर्च देवविला असता तर त्यास तो खर्च ज्याप्रमाणें वसूल करतां आला असता, त्याप्रमाणें फिर्यादीस वसूल करितां येईल.

(३) असा खर्च वसूल करण्याच्या कामीं फिर्यादीला कोर्टास कोणतीही फी द्यावी लागणार नाहीं.

"आईन १८२.—हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्याचीं हत्यारें, कपडे, साजसरंजाम, किंवा पलटणीसंबंधी सामान किंवा जरूरीच्या जिनसा व त्याचप्रमाणें आपल्या हुद्याचें काम करण्याच्या कामीं तो वापरीत असेलतें कोणतेंही जनावर धरतां कामा नये त्याचप्रमाणें, अशा मनुष्यावर बजावावयाच्या कोणत्याही हुकुमनाम्याच्या किंवा हुकुमाच्या भरपाईसाठीं कोणत्याही सिव्हिल किंवा रेव्हेन्यू कोर्टानें किंवा कोणत्याही मुलकी अमलदारानें केलेल्या हुकुमावरून त्या मनुष्याचा पगार व नेमणुका किंवा पगाराचा किंवा नेमणुकांचा कोणताही भाग जप्त करतां कामा नये. जप्ती माफ असलेला माल.

"आईन १८३.—हिंदुस्थानच्या रिझर्व फौजेंतील दरेक मनुष्याला, अमलदार किंवा शिपाई ह्या नात्यानें, हे आईन लागू असणाऱ्या मनुष्यास गेल्या शेवटच्या दोन आईनांमध्यें जे हक्क दिलेले आहेत, ते सर्व हक्क मिळण्याचा अख्त्यार आहे. सदरील शेवटचे दोन आईन रिझर्व फौजेंतल्या लोकांस लागू करणें.

"आईन १८४.—(१) हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही अमलदारानें किंवा शिपायानें कोणत्याही कोर्टांत कोणताही दावा किंवा इतर काम वादीतर्फें किंवा प्रतिवादीतर्फें चालविण्यासाठीं गैरहजिरीची रजा मिळण्याकरितां अर्ज केलेला आहे असा ज्या खटल्यांत एतद्देशीय अमलदार व शिपाई ह्यांचा संबंध असेल त्यांची सुनावणी कोर्टानीं आधी करणें.

किंवा त्यास त्या कामासाठीं जशी रजा मिळालेली आहे असा योग्य लष्करी अधिकाऱ्याचा दाखला त्या अमलदारानें किंवा शिपायानें किंवा त्या अमलदाराच्या किंवा शिपायाच्या वतीनें त्या कोर्टांत हजर केल्यास त्या कोर्टानें त्या अमलदाराकडून किंवा शिपायाकडून अर्जी झाल्यास, त्या दाव्याची अगर इतर कामाची सुनावणी व निकाल सदर्हू प्रमाणें मागितलेल्या किंवा दिलेल्या रजेच्या आंत करण्याची तजवीज, करवेल तेथवर, केली पाहिजे.

(२) सदर्हू प्रकारच्या योग्य लष्करी अधिकाऱ्याच्या दाखल्यांत, दिलेल्या किंवा मागितलेल्या रजेचा पहिला व शेवटला दिवस नमूद केला पाहिजे, आणि ती रजा ज्या दाव्याच्या संबंधानें देण्यांत आली अगर मागण्यांत आली त्या दाव्याचें वर्णन दिलें पाहिजे.

(३) असा कोणताही दाखला रुजू करण्याबद्दल किंवा सदर्हू प्रकारच्या कोणत्याही अमलदारानें किंवा शिपायानें किंवा त्याच्या वतीनें, त्याच्या दाव्याची सुनावणी आधीं होण्याकरितां केलेल्या कोणत्याही अर्जीबद्दल, त्या कोर्टांत कोणतीही फी भरावी लागणार नाहीं.

(४) सदर्हू प्रकारच्या दिलेल्या किंवा मागितलेल्या रजेच्या मुदतीच्या आंत त्या दाव्याची अगर इतर कामाची सुनावणी व अखेर निकाल करण्यास तें कोर्ट असमर्थ असल्यास, त्यानें तसें करण्यास असमर्थ असल्याचीं आपलीं कारणें लिहून ठेविलीं पाहिजेत, आणि त्या अमलदारानें किंवा शिपायानें मागितल्यास त्या कारणांची एक नकल त्यास देवविली पाहिजे; मात्र अशी नकल मागण्याच्या अर्जीबद्दल किंवा त्या नकलेबद्दल त्या अमलदाराकडून किंवा शिपायाकडून कोणताही पैसा घेतां कामा नये.

(५) सदर्हू प्रकारचा दाखला देण्यास लायक असा योग्य लष्करी अधिकारी कोणता असा प्रश्न कोणत्याही दाव्यांत उत्पन्न झाल्यास, तो, कोर्टानें, कोरचा ताबा असणाऱ्या सर्वांत जवळच्या अमलदाराकडे निकालासाठीं पाठवावा; आणि त्या अमलदारानें केलेला निकाल अखेरचा होय असें समजलें पाहिजे.

चाकरी सोडून पळून गेलेल्यांस धरणें.

"आईन १८५.—(१) हे आईन लागू असणारा कोणी मनुष्य चाकरी सोडून पळून जाईल तेव्हां, तो ज्या कोराचा, डिपार्टमेंटाचा, अगर डिव्हाचमेंटाचा असेल, त्या कोराच्या, खात्याच्या किंवा डिव्हाचमेंटाच्या कमांडिंग आफिसरानें, त्यास जे सिव्हिल, राजकीय किंवा पोलीस अधिकारी त्या चाकरी सोडून पळून गेलेल्या मनुष्यास धरण्याच्या कामीं मदत करूं शकतील असें वाटेल त्या अधिकाऱ्यांकडे तो मनुष्य चाकरी सोडून पळून गेल्याबद्दल लेखी बातमी दिली पाहिजे; आणि अशी लेखी बातमी देण्यांत आली ह्मणजे त्या अधिकाऱ्यांनीं, तो चाकरी सोडून पळून गेलेला मनुष्य, ज्यास धरण्याविषयीं एखाद्या माजिस्ट्रेटानें वारंट काढिलें आहे असा मनुष्य आहे असें समजून, त्यास धरण्याची तजवीज केली पाहिजे, आणि त्यास धरल्यानंतर लष्करी अटकेंत ठेवण्यासाठीं स्वाधीन केलें पाहिजे.

(२) त्याच प्रमाणें सदर्हू अधिकाऱ्यांनीं, ज्या मनुष्यांस सदर्हू आईन लागू आहेत असा वाजवी गुमान असेल त्या मनुष्यांस, ते कामगिरीवर असल्याशिवाय किंवा त्यांस रजा किंवा फांटा दिल्याचा दाखला त्यांजवळ असल्याशिवाय, आपल्या हुकुमतींतल्या प्रदेशांमधून जाऊं देण्याची बंदी करण्याविषयीं जे इलाज आपणास अत्यंत योग्य वाटतील ते करून, तशी बंदी केली पाहिजे.

(३) जो मनुष्य अधिकाराशिवाय एका जागेहून दुसऱ्याजागीं जात आहे असा वाजवी गुमान असेल त्या मनुष्यास वारंटाशिवाय धरण्याचा कोणत्याही पोलीस अमलदारास अखत्यार आहे; आणि त्यानें त्यास त्याची कायद्याप्रमाणें तजवीज होण्याकरितां,

विलंब न लावितां, सर्वांत जवळचे माजिस्ट्रेटाकडे किंवा कोणताही माजिस्ट्रेट लवकर मिळण्यासारखा नसल्यास सर्वांत जवळच्या लष्करी कमांडिंग आफिसराकडे हजर केलें पाहिजे.

"आईन १८६.—हें आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्यावर कोणताही लष्करी गुन्हा केल्याचा आरोप आलेला असून तो मनुष्य कोणत्याही सिव्हिल, राजकीय किंवा पोलीस अमलदाराच्या हुकुमतींत असेल, तेव्हां, त्यास धरून लष्करी अटकेंत देण्याच्या कामीं मदत करण्याविषयीं त्या मनुष्याच्या कमांडिंग आफिसराच्या सहीची लेखी दरखास्त आली असतां तसें करण्याच्या कामीं त्या अमलदारानें मदत केली पाहिजे. लष्करी गुन्हेगारांस धरणें.

"आईन १८७.—ह्या आईनांअन्वयें चालत असलेल्या कोणत्याही कामामध्यें, जी कोणतीही अर्जी, दाखला, वारंट, जबाब, किंवा इतर दस्तऐवज सरकारच्या सिव्हिल किंवा लष्करी चाकरींतील अमलदाराच्या सहीचा ह्मणून असेल तो हजर केला असतां, तो ज्या मनुष्यानें ज्या हुद्याच्या नात्यानें सही केलेला ह्मणून असेल, त्या मनुष्यानें त्या हुद्याच्या नात्यानें योग्य रीतीनें त्यावर सही केलेली आहे असें, उलट शाबीत करण्यांत येई तोंपर्यंत समजलें पाहिजे. सह्यांविषयीं काय समजावयाचें तें.

"आईन १८८.—(१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस असें फर्माविण्याचा अधिकार आहे कीं ह्या आईनांच्या कारणांसाठीं.— आर्मी कमांडखालीं असलेले सदर्हू लष्कराचे भाग.

(अ) कोणत्याही कमांडखालीं असलेला मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्कराचा कोणताही भाग, त्या कमांडच्या साधारण हद्दींच्या बाहेर चाकरी करीत असतांना, त्या कमांडच्या जनरल आफिसराच्या अधिकारास पात्र राहील, अगर

(ब) कोणत्याही कमांडखालीं नसलेला सदर्हू लष्कराचा कोणताही भाग कोणत्याही कमांडच्या दिमतीस दिला जाईल, आणि तो त्या कमांडच्या जनरल आफिसराच्या अधिकारास पात्र होईल.

(२) ह्या आईनाची रकम (१) हीअन्वयें जो हुकुम करण्यांत येईल तो शिवाय करून इतर बाबतींत, सदर्हू लष्कराचा कोणताही भाग कोणत्याही कमांडमध्यें चाकरी करीत असतांना, ह्या आईनांचे कारणांसाठीं, त्या कमांडच्या जनरल आफिसराच्या अधिकारास पात्र राहील.

"आईन १८९.—इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांस पार्लमेंटच्या कोणत्याही आक्टांत दिलेल्या किंवा रॉयल वारंट किंवा रॉयल कमिशनअन्वयें दिलेल्या अधिकारास ह्या आईनांतल्या कोणत्याही ठरावावरून बाध येतो असें समजूं नये. इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांस असलेल्या अधिकाराचा बचाव.

"आईन १९०.—(१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, जाहिरनामा देऊन, कोर्टमार्शलांनीं काम कसें चालवावें ह्याचें व ह्या आईनांअन्वयें कोणतीही हुकुमत अगर अधिकार असणाऱ्या लष्करी, सिव्हिल अगर राजकीय अमलदारांनीं काम कसें चालवावें ह्याचें नियमन करण्यासाठीं, आणि ह्या आईनांअन्वयें इनसाफ व्हावयाच्या गुन्ह्यासंबंधाची चौकशी, त्यांचा इनसाफ व त्यांबद्दल शिक्षा ह्यांसंबंधाचे ह्या आईनांतले ठराव अमलांत आणण्यासाठीं, कानू करण्याचा अधिकार आहे. कानू करण्याचा अधिकार.

(२) ह्या आईनाअन्वयें करावयाच्या कानूंमध्यें इतर बाबतींशिवाय, खालील बाबतींसंबंधानेंही ठराव करण्याचा अखत्यार आहे:—

(अ) कोर्ट आफ इनक्वायरी भरण्याच्या व त्यांनीं काम कसें चालवावें ह्याच्या संबंधानें.

(ब) कोर्टमार्शलें भरविण्याच्या संबंधानें, व त्यांच्या रचनेच्या संबंधानें;

(क) कोर्टमार्शलें तहकूब करण्याच्या, त्यांचें विसर्जन करण्याच्या व त्यांच्या बैठकींच्या संबंधानें;

(ड) इन्साफ करितांना कोर्टमार्शलांनीं काम कसें चालवावें त्यासंबंधानें;

(इ) कोर्टमार्शलांनीं केलेल्या ठरावांच्या व शिक्षेच्या ठरावांच्या बाहाली संबंधानें व तपासणी संबंधानें;

(फ) कोर्टमार्शलांनीं केलेले शिक्षेचे ठराव अमलांत आणण्याच्या संबंधानें;

(ग) ह्या आईनांतील ठरावांअन्वयें कोर्टमार्शलांच्या बाबतींत अगर काळें-पाण्याच्या किंवा कैदेच्या शिक्षेच्या बाबतींत करावयाच्या हुकुमांच्या नमुन्यांसंबंधानें.

(३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, सदर्हू प्रकारची कोणतीही कानू करून, कोणत्याही कोर्टमार्शलास किंवा अमलदारास, सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा ह्यांत अवल हुकुमतीच्या कोर्टास जो कोणताही अधिकार दिलेला आहे, तो (आरोपित मनुष्याचा इन्साफ करण्याचा किंवा शिक्षा देण्याचा अधिकार शिवाय करून इतर अधिकार) देण्याचा अधिकार आहे.

ज्याअर्थी, [इंग्लंड देशाचा] सैन्याबाबद आक्ट, कलम १७७, ह्यांत असें ठरविलें आहे कीं, हिंदुस्थानांत कोणतेंही सैन्य उभारण्यांत येईल तेव्हां अशा सैन्यांतल्या अमलदारांस, गैर-सनदी अमलदारांस व शिपायांस, हिंदुस्थानच्या हद्दींच्या आंत किंवा त्या हद्दींच्या बाहेर, हिंदुस्थानांतला कायदा लागू करण्याचा अख्त्यार आहे,

आणि ज्याअर्थी, हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांच्या अधिकारा-अन्वयें हिंदुस्थानांत उभारलेलें व राखलेलें विवक्षित सैन्य सदर्हू आईन लागू असलेल्या मलिका मुआज्ज़मांच्या लष्कराचा अंश आहे किंवा नाहीं ह्याबद्दल शंका आहे आणि त्या सैन्याच्या शिस्तीसाठीं व नियमनासाठीं तजवीज करणें इष्ट आहे,

त्याअर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांतील विवक्षित सैन्यास सदर्हू आईन लागू करण्याचा अधिकार.

७४. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, जाहिरनामा देऊन, ह्या आक्टा-अन्वयें सुधारलेल्या सदर्हू आईनांतले सर्व किंवा कोणतेही ठराव, सदर्हू प्रकारच्या कोणत्याही सैन्यास लागू करण्याचा, आणि असा कोणताही जाहिरनामा रद्द करण्याचा किंवा कंपेश करण्याचा अधिकार आहे.

(२) सदर्हू आईनांतले कोणतेही ठराव सदर्हू प्रकारच्या कोणत्याही सैन्यास लागू केलेले असतांना, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, जाहिरनामा देऊन, त्या ठरावांच्या अमलास आनुषंगिक अशी कोणतीही हुकुमत, अधिकार किंवा कर्तव्यें त्या सैन्याच्या संबंधानें कोणत्या अधिकाऱ्यानें चालवावीं तें फर्माविण्याचा अख्त्यार आहे.

पुरवणी.

समरी जनरल कोर्टमार्शलाचें चालविलेलें काम दफ्तरीं दाखल करण्याचा नमुना.

(लष्करी कायद्याचें म्यानुअल पाहा.)

हेतु व कारणें यांचें निरूपण.

हिंदुस्थानचे लश्करी आईन नामक सन १८६९ चा आक्ट ९ यांत पुष्कळ व्यंगें व फाजील मजकूर असल्याकारणानें व तसेंच त्याची रचना बरोबर नसल्यामुळें त्यांत सुधारणा करण्याची व त्यांतील मजकुराची नवीन व्यवस्था करण्याची जरूरी बहुत दिवसांपासून दिसून आलेली आहे.

सन १८८७ सालीं हिंदुस्थानचा सैन्याबाबतच्या आक्टाचा मसुदा हा इंग्लंड देशाच्या सैन्याबाबदच्या आक्टाच्या धोरणांवर तयार केलेला असून, असें करण्याचा उद्देश, सदरहू सैन्याबाबदचा आक्ट व त्याच्या पूर्वीचा बंदोबस्ताबाबदचा आक्ट यांवरून ब्रिटिश सैन्यामध्यें लश्करी कायद्यांत केलेल्या सुधारणा, एतद्देशीय सैन्यास, त्याच्या निराळ्या स्थितिमानाप्रमाणें लागू करतां येतील तेथवर कराव्या, हा होता; परंतु सदरहू मसुदा सेक्रेटरी आफ् स्टेट यांस पसंत न पडल्यामुळें, सन १८६९ च्या ९ व्या आक्टाची सुधारणा करण्याकरितां मसुदा तयार करण्याविषयीं हुकूम फर्माविण्यांत आला व तो मसुदा आतां सादर करण्यांत येत आहे. या मसुद्यांत, सन १८८७ चा हिंदुस्थानचा सैन्याबाबदच्या आक्टाचा मसुदा यांतील सूचनांस पुष्कळ अंशीं अनुसरून, सदरहू लश्करी आईनांतील फक्त मोठमोठ्या व्यंगांच्या संबंधानें मात्र व्यवस्था करण्यांत आली आहे.

सदरहू आक्टाची सुधारणा करण्याचें दुसरें कारण, इलाखानिहाय चालू असणारी पद्धत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ठरवितील त्या तारखेपासून बंद करण्याकरितां पार्लमेंटनें मद्रास व मुंबई या इलाख्यांच्या सैन्यांबाबद आक्ट ठरविला त्यावरून उत्पन्न झालें आहे.

नवीन व्यवस्थेअन्वयें हिंदुस्थानच्या सैन्याच्या ज्या चार कमांड करावयाच्या आहेत त्यांतील फौजांचा ताबा असणाऱ्या जनरल आफिसरांस, मद्रास व मुंबई इलाख्यांचे कमांडर-इन्-चीफ यांस हल्लीं असणारे सर्व अधिकार देणें योग्य आहे असा विचार झाला आहे.

मद्रास व मुंबई इलाख्यांच्या गव्हर्नरांस हल्लीं असणारे अधिकार सर्वांशीं रद्द केले आहेत.

ज्या सुधारणा करण्याचें योजिलें आहे त्यांपैकीं विशेष महत्त्वाच्या कांहीं सुधारणांचा खुलासा, साधेल तेथवर कलमांच्या अनुक्रमाप्रमाणें केला आहे.

---

१. कलम २ यांत लश्करी कायदा लागू असणाऱ्या मनुष्यांचे निरनिराळे वर्ग सांगितले आहेत. जे मनुष्य गझेटेड, प्रतिज्ञा केलेले किंवा पटांत नांव दाखल झालेले असे नसून ज्यांस फक्त ते चाकर किंवा बुणगें असल्याकाणानें सदरील वर्गांत धरलें आहे, त्यांस सदरहू कायदा फक्त ते मोहिमींत किंवा तळ देऊन असतांना, कुच करीत असतांना किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ज्या सरहद्दीवरील नाक्यावर तो लागू असल्याविषयीं फर्मावितील त्या नाक्यावर मात्र लागू केला आहे असें लक्षांत येईल.

यावरून असें ठरतें कीं एतद्देशीय सैन्याच्या दिमतींतील ज्या मनुष्यांस क्यान्टोन्मेंटमध्यें लश्करी कायदा लागू करण्याचा विचार आहे त्या सर्वांनीं प्रतिज्ञा केली पाहिजे किंवा त्यांचीं नांवें पटांत दाखल केलीं पाहिजेत, आणि कोणत्या वर्गाच्या मनुष्यांचीं नांवें पटांत दाखल करावयाचीं व कोणत्या वर्गाच्या मनुष्यांनीं प्रतिज्ञा करावयाची हें एक्झिक्युटिव अधिकाराअन्वयें ठरवावें अशी तजवीज केली आहे.

२. कलम ६ यांत, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, कोणत्या मनुष्यांचीं नांवें फक्त पटांतच दाखल करावयाचीं किंवा तीं पटांत दाखल करून आणखी त्यांच्याकडून प्रतिज्ञा करवावयाची हें जाहीर करण्याचा अधिकार आहे, असें ठरविलें आहे. प्रतिज्ञा करणें व पटांत नांव दाखल करणें या दोन गोष्टींमधील भेदाकडे सर्व प्रसंगीं लक्ष पुरविण्यांत आलेलें असावें असें दिसत नाहीं, ह्मणून ज्या मनुष्यांचीं नांवें पटांत दाखल करावयाचीं त्यांजकडून प्रतिज्ञा करविलेली असेल व ज्यांनीं प्रतिज्ञा करावयाची त्यांचीं नांवें पटांत दाखल झालेलीं असतील; आणि ज्याअर्थीं या कलमाच्या सुधारणेंत, प्रतिज्ञा केलेल्या व पटांत नांव दाखल केलेल्या मनुष्यांमध्यें कांहीं महत्वाचे भेद केले आहेत, त्याअर्थीं जुन्या कायद्याअन्वयें ज्या मनुष्यांनीं प्रतिज्ञा केलेली असेल तीं नव्या कायद्याअन्वयें पटांत नांवें दाखल केलेलीं मनुष्यें होत आणि जुन्या कायद्याअन्वयें ज्यांचीं पटांत नांवें दाखल केलेलीं असतील तीं नव्या कायद्याअन्वयें प्रतिज्ञा केलेलीं होत, असें फर्माविण्याविषयीं इंडियाचे कमांडर-इन्-चीफ व चार कमांडमधील फौजांचा ताबा असणारे जनरल आफिसर यांस, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं कोणत्याही कानू ठरविल्यास त्या लागू राहून, अधिकार दिल्यानें चांगलें होईल असा विचार झाला आहे.

पोटकलम (३) यांत असें ठरविलें आहे कीं, कोणत्याही मनुष्याचें नांव पटांत दाखल केल्यावर होईल तितक्या लवकर त्याजकडून सिव्हिल किंवा लष्करी अमलदारापुढें सांगितलेल्या नमुन्याप्रमाण प्रतिज्ञा करविली पाहिजे: मात्र रिक्रूटाच्या बाबतींत ते कामास लायक असल्याविषयीं जाहीर करण्यांत येईल तेव्हां त्यांनीं प्रतिज्ञा करावी असें ठरविलें आहे; आणि हा अमलदार साधारणतः माजिस्ट्रेटचे अधिकार असणारा अमलदार असावा असा इरादा आहे एवढें येथें सांगितलें पाहिजे.

३. या सुधारणेच्या संबंधानें काहींशा महत्त्वाचा एक प्रश्न उत्पन्न होतो. तो ब्रिटिश कोरांत काम करणाऱ्या एतद्देशीय लोकांच्या वर्गांची कशी व्यवस्था करावी हा होय.

सदरहू प्रकारचे मनुष्य काहीं प्रसंगीं केवळ चाकर असतील: उदाहरणार्थ, ब्रिटिश घोडेस्वारांच्या पलटणीच्या दिमतींतील घासकापे; परंतु इतर प्रसंगीं, ब्रिटिश जड तोफखान्याच्या दिमतींतील माहूत वगैरे वर्गांतील मनुष्यें हीं कोराचा एक अवश्य भाग होत असें ह्मणतां येईल.

सदरहू वर्गांतील कित्येक मनुष्यांस लष्करी कायदा लागू करण्याची अवश्यकता कबूल झालेली आहे असें दिसतें; आणि त्यांस असा कायदा लागू करणें असल्यास, एतद्देशीय सैन्याबाबदचा लष्करी कायदा लागू केला पाहिजे हें उघड आहे, शिवाय असें करणें हें, दंग्याबाबदचे आक्ट व सदरहू इंग्लंड देशाचा सैन्याबाबदचा आक्ट यांमध्यें, आणि ब्रिटिश पहाडी तोफखान्याच्या गाड्या हांकणारे एतद्देशीय मनुष्य व ट्रान्स्पोर्ट कोराचे मनुष्य यांस हिंदुस्थानच्या लष्करी आईनांखालीं आणण्याविषयीं हिंदुस्थान सरकारानें नुकतीच जी तजवीज केली आहे तिजवरून दिसून येणाऱ्या सामान्य इरायास अनुसरून आहे.

इंग्लंड देशाचा सैन्याबाबद आक्ट यावरून ह्या वर्गांच्या कोणत्याहि मनुष्यांस हिंदुस्थानचा लष्करी कायदा लागू करण्यांत आला आहे तो ते मनुष्य मोहिमीवर असतात तेव्हांच मात्र त्यांना कित्येक बाबतींत लागू होतो—कलम १७६ (१०) पहा; आणि त्यांचें पटांत नांव दाखल करून किंवा हिंदुस्थानच्या [लष्करी] आईनांअन्वयें कोणत्यातरी रीतीनें त्यांजकडून प्रतिज्ञा करवून मग, ते ब्रिटिश कोराच्या तैनातींत देण्यांत आले तथापि, त्यांना एतद्देशीय फौजेंतील, व हिंदुस्थानच्या आईनांस पात्र असणाऱ्या, मनुष्याप्रमाणें वागविण्याची नेहमींची चाल आहे असा समज आहे. सदहू सुधारणुकीवरून ही चाल केवळ पटांत नांव दाखल केलें असून प्रतिज्ञा न केलेल्या मनुष्यांच्या बाबतींत चालू राहील, मात्र इतकेंच कीं तिला थोडेंसें कायद्याचें स्वरूप प्राप्त होईल. ह्या मनुष्यांचीं नांवें त्यांच्या अनुमतानें केवळ यादींत दाखल करण्याखेरीज, जेणेंकरून त्यांना लष्करी कायद्यास पात्र करतां येईल असा कोणताहि अधिक कडक नियम ठरविणें ही गोष्ट या मनुष्यांच्या बाबतींत असाध्य होण्याचा संभव आहे. यास्तव ज्या यादीवर त्यांचीं नांवें दाखल केलीं असतील त्या यादीचा केवळ याच कामाकडे उपयोग करणें वाजवी आहे. उदाहरणार्थ, ज्यांना लष्करी कायद्यास लागू करण्याचा इरादा नाहीं अशा इतर वर्गांच्या एतद्देशीय नोकरांचीं नांवें ज्यांत असतील अशा ब्रिटिश कोराच्या पगाराच्या यादींत फक्त त्यांचीं नांवें दाखल केलीं तर त्यांच्या दरज्यांत व इतर नोकरांच्या दरज्यांत जो भेद असतो तो जाणण्यास कांहींच साधन राहणार नाहीं, व आजपर्यंत वारंवार घडून येत आलें आहे त्याप्रमाणें, ते मनुष्य लष्करी कायद्यास पात्र होते किंवा नव्हते याबाबदच्या महत्वाच्या मुद्यावर संशय उत्पन्न होण्याचा संभव आहे. ही अडचण दूर करण्यासाठीं, पटांत नांव दाखल करावयाच्या मनुष्याचें नांव मलिका माआझमांच्या हिदुस्थानच्या लष्कराच्या कोणत्यातरी कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या यादीवर दाखल केलें पाहिजे असें सदहू सुधारणुकीवरून ठरविलें आहे. यास्तव अशा ब्रिटिश कोरांत विशेष यादी ठेवाव्या लागतील व त्या यादींत, त्या कोराच्या दिमतीस असलेल्या ज्या एतद्देशीय मनुष्यांस हिंदुस्थानच्या लष्करी कायद्यास पात्र करण्याची इच्छा असेल त्यांना मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्कराच्या कोणत्यातरी प्रकारच्या नोकरांतील, कोरांतील किंवा डिपार्टमेंटांतील इसम ह्मणून दाखल करण्यांत येईल. यापासून फारसा त्रास पडणार नाहीं व या मनुष्यांच्या दरज्याच्या संबंधानें ज्या अडचणी हल्लीं वेळोवेळीं उत्पन्न होतात त्या दूर होतील.

४. आईन २ (१), (२), (३) व (४) यावरून, लष्करी कायद्यास पात्र असणाऱ्या नोकरांस व बुणग्यांस, कायद्याच्या कोणत्याहि ठरावाच्या कारणांसाठीं, शिपायाच्या दरज्याहून वरचा दरजा देण्याचा अखत्यार कित्येक अधिकाऱ्यांस दिला आहे व असें करण्याविषयीं इंग्लंड देशाच्या सैन्याबाबदच्या आक्टाचें कलम १७६ (८) यावरून सुचविलें आहे; परंतु या देशांतील सैन्याबरोबर साहित्यसामान पुरविण्याच्या संबंधानें, कारकुनी कामाच्या संबंधानें, खासगी व्यापाराच्या संबंधानें व इतर संबंधानें जीं पुष्कळ माणसें असतात त्यांच्या निरनिराळ्या प्रकारच्या अनेक स्थितींकडे

लक्ष्य दिल्यावरून, जास्त मुखत्यारी देणें व सदर्हूप्रमाणें वरच्या दरज्याचा हुद्दा देऊं देणें तो केवळ अमलदाराच्याच दरज्याचा नव्हे तर वारंट आफिसराच्या किंवा गैरसनदी अमलदाराच्या दरज्याचाहि देऊं देणें इष्ट आहे असें वाटलें आहे.

५. **आईन** २ (५) यावरून **गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल** यांस, कोणत्याहि मनुष्याचा दरजा काय आहे याबाबद किंवा कोणताहि मनुष्य एकाद्या अमुक दरज्याच्या वरच्या दरज्याचा आहे किंवा खालच्या दरज्याचा आहे याबाबद कोणताहि संशयाचा प्रश्न उपस्थित होईल त्या प्रसंगीं त्या प्रश्नाचा निकाल करण्याचा अधिकार दिला आहे, आणि सदर्हू आईनाची ही रकम, जे आईन, उदाहरणार्थ, "वारंट आफिसराच्या दरज्याच्या खालच्या" किंवा "गैरसनदी अमलदाराच्या दरज्याच्या खालच्या" मनुष्यांस लागू आहेत त्या आईनांच्या संबंधानें या मसुद्यांत घातली आहे; लश्करी आईन लागू असणाऱ्या मनुष्याचा दरजा ठरविण्यास कधींहि अडचण पडणार नाहीं अशी समजूत आहे; परंतु ज्या अर्थीं पटांत नांव दाखल केलेल्या किल्येक मनुष्यांच्या बाबतींत संशय उपस्थित होण्याचा संभव आहे त्या अर्थीं तसा संशय जेणेंकरून दूर करतां येईल असा ठराव करणें योग्य वाटलें आहे.

६. आईन ३ व ४.—विद्यमान कायद्याअन्वयें, सनदी अमलदारास किंवा इतर मनुष्यास दिलेला फांटा व बर्तर्फी यांत जो भेद आहे तो जाणणें खरोखर अशक्य आहे. बर्तर्फी झाली असतां पेनशनाचा सर्व दावा रद्द होतो ही गोष्ट गैरसोयीची आहे असें वारंवार आढळून आलें आहे. एकाद्या सनदी अमलदारास किंवा शिपायास, त्यानें चाकरी करून कमावलेलें पेनशन जेणेंकरून रद्द करण्याची गरज नाहीं अशा शर्तींवर फांटा देणें इष्ट असण्याचा वारंवार संभव असतो.

हा हेतु सदर्हू योजलेल्या सुधारणुकीच्या योगानें, फांटा दिलेल्या मनुष्याच्या संबंधानें अन्याय न होतां, सिद्धीस जाईल.

याशिवाय ४ थ्या आईनांत, डिव्हिजनांचा किंवा डिस्ट्रिक्टांचा ताबा असणाऱ्या **जनरल आफिसरांस** बर्तर्फी किंवा फांटा देण्याचा अधिकार देण्याच्या संबंधानें जी आणखी सुधारणूक केली आहे ती फार इष्ट आहे असें वाटलें आहे. हा अधिकार [सध्या] पंजाबच्या **सरहद्दीवरील फौजेचा व हैदराबाद कान्टिंजंटाचा** ताबा असलेले **जनरल आफिसर** विद्यमान कायद्याअन्वयें चालवीत असून त्याचा उपयोग चांगला झाला आहे.

कोर्टमार्शलें.

७. कोर्टमार्शलासंबंधाच्या पद्धतींत बराच सुलभपणा आणण्याचा ह्या **मसुद्यांत** प्रयत्न केलेला आहे, आणि त्यामुळें, हल्लीं अमलांत असलेल्या आईनांपैकीं पुष्कळ आईन रद्द करावे लागले आहेत. हल्लीं कोर्टमार्शलांचे प्रकार कमींतकमी दाहा आहेत. आईन ७२ ह्यांत दिलेल्या यादींत कोर्टमार्शलाचे प्रकार आठच सांगितले आहेत हें खरें आहे, परंतु त्या यादींत "जनरल कोर्टमार्शल" व "डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शल" अशीं जीं दोन कोर्टमार्शलें सांगितलीं आहेत, त्या प्रत्येकांत, **आर्डर इन् कौन्सिलच्या** द्वारें भरविलेलें व इतर रीतीनें भरविलेलें असें दोन पोटभेद असून व्यवहारांत त्या पोटभेदांस अगदीं निरनिराळीं कोर्टें मानितात.

कोर्टमार्शलांसंबंधानें ह्या मसुद्यांत जी सुधारणा केलेली आहे, तीअन्वयें कोर्टमार्शलाचे केवळ पांचच प्रकार अमलांत येतील:—

जनरल कोर्टमार्शल,
डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शल व
रेजीमेंटल कोर्टमार्शल } ह्यांस आर्डिनरी कोर्टमार्शल म्हटलें आहे.

आणि

समरी जनरल कोर्टमार्शल
व समरी कोर्टमार्शल } ह्यांस एक्स्ट्राआर्डिनरी कोर्ट मार्शल म्हटलें आहे.

८. ह्या **मसुद्यांतलें जनरल कोर्ट-मार्शल** हें [इंग्लंड देशांतला] **सैन्याबाबद आक्ट** ह्यांतल्या व प्रस्तुत अमलांत असलेल्या **आईनांतल्या जनरल कोर्टमार्शलाच्याच** जोडीचें आहे: मात्र त्यांत नऊ अमलदारांच्या ऐवजीं सात अमलदार असावयाचे आहेत. आणि ते सात अमलदार मिळण्यासारखे नसले तर त्या कोर्टमार्शलांत पांचांपेक्षां कमी नाहींत इतके अमलदार असले तरी चालतील.

ह्या मसुद्यांतलें डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शल हें प्रस्तुत अमलांत असलेल्या आईनांतील डिस्ट्रिक्ट व ग्यारिसन कोर्ट-मार्शलांच्याच जोडीचें आहे; परंतु त्यांत व हल्लींच्या डिस्ट्रिक्ट व ग्यारिसन कोर्टमार्शलांत पुढें लिहिलेल्या बाबतींच्या संबंधानें फरक आहे:—त्यांत सात अमलदारांच्या ऐवजीं निदान पांच अमलदार असतील परंतु पांच अमलदार मिळण्यासारखे नसले तर निदान तीन अमलदार असले ह्मणजे पुरे होतील; त्याला प्रस्तुतच्या आईनांतल्या सर्व गुन्ह्यांचा इन्साफ करण्याचा अधिकार दिलेला आहे, आणि त्याच्या जोडीच्या कोर्टमार्शलांस एक वर्षपर्यंत कैदेच्या शिक्षेचा जो अधिकार आहे, तो वाढवून ह्या कोर्टास दोन वर्षांची कैदेची शिक्षा देण्याचा अधिकार दिलेला आहे. ह्या शेवटच्या बाबतींत, ह्या मसुद्यांतलें डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शल [इंग्लंड देशांतल्या] सैन्याबाबद आक्टांतल्या डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलच्या बरोबरीला आणून ठेविलें आहे हें दिसून येईल.

ह्या मसुद्यांतलें रेजिमेंटल कोर्टमार्शल हें, हल्लीं अमलांत असलेल्या आईनांतलें रेजिमेंटल कोर्टमार्शल, रेजिमेंटल डिट्याचमेंट कोर्टमार्शल, व डिट्याचमेंट कोर्टमार्शल ह्यांच्याच जोडीचें आहे; त्यास अधिकारही तेच आहेत, परंतु त्यांत पांचांच्या ऐवजीं तीन अमलदार असावयाचे आहेत.

ह्या कोर्टमार्शलास, लष्करी मोठ्या गुह्यांपैकीं बऱ्याच गुह्यांचा इन्साफ करण्याची आणि वरिष्ठ अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय कोणत्याही सिव्हिल गुन्ह्याचा इन्साफ करण्याची मनाई आहे. हल्लींचे लष्करी आईन लागू असणारा जो कोणताही मनुष्य गैरसनदी अमलदाराच्या वरील दर्जाचा नसून तें कोर्ट भरविणाऱ्या अमलदाराच्या ताब्यांतला असेल त्या मनुष्याचा मात्र इन्साफ करण्याचा त्या कोर्टास अधिकार आहे.

९. आईन ८९.—कोणत्याही आर्डिनरी कोर्टमार्शलाचा ठराव व शिक्षेचा ठराव ह्यांस बहालीची अपेक्षा ठेविलेली आहे आणि त्यांस बहाली मिळेल त्या पुरते मात्र ते कायदेशीर होतील असें ठरविलें आहे. हें हल्लीं अमलांत असलेल्या कायद्यास बहुतेकअंशीं अनुसरूनच आहे, परंतु त्यांत आईन ८९ अ, पोट कलम (१) ह्याअन्वयें एक महत्वाचा फेरफार करण्याचें योजिलें आहे. तो फेरफार हा कीं, मोहिमींतले प्रसंग व हिंदुस्थानच्या हद्दींबाहेरील प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, मरणाची शिक्षा, काळेपाण्याची शिक्षा, अगर सात वर्षांहून जास्त मुदतीची कैदेची शिक्षा, ह्यांची बाहाली करण्याचा अधिकार, इंडियाचे कमांडर इन् चीफ, कोणत्याही कमांडचा जनरल आफिसर अगर कोणत्याही कमांडच्या दिमतीस नसलेल्या कोणत्याही फौजेचा ताबा असणारा कोणताही अमलदार ह्यांस मात्र दिलेला आहे.

१०. एक्स्ट्रा-आर्डिनरी कोर्टमार्शलांपैकीं समरी जनरल कोर्टमार्शल हें [इंग्लंड देशाचा] सैन्याबाबद आक्ट ह्यांतल्या फील्ड जनरल कोर्टमार्शलच्या व हल्लीं अमलांत असलेल्या आईनांतल्या डिट्याचमेंट जनरल कोर्ट-मार्शलच्या जोडीचें आहे, आणि तें, हल्लींच्या आईनांअन्वयें आर्डर इन् कौन्सिल काढून भरवितां येणारें परंतु हल्लीं भरविण्यांत येत नाहीं त्या जनरल कोर्टमार्शलाच्या ऐवजीं उपयोगी पडावें ह्मणून योजिलेलें आहे. हें कोर्टमार्शल भरविणें तें, हिंदुस्थान सरकारानें किंवा इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांनीं किंवा कोणत्याही कमांडच्या जनरल आफिसरानें किंवा मलिका मआझमांच्या फौजेपैकीं जो सुटा भाग मोहिमीवर असेल त्या भागाचा ताबा असणाऱ्या कोणत्याही अमलदारानें मुद्दाम अधिकार दिलेल्या कोणत्याही अमलदाराकडून, कोणत्याही गुन्ह्याचा इन्साफ, लष्करी शिस्तीकडे व लष्करी नोकरीच्या गरजांकडे लक्ष देतां आर्डिनरी जनरल कोर्टमार्शलानें करणें इष्ट नाहीं असें त्या अमलदारास वाटेल तेव्हां, भरविण्यांत येईल.

सदरील कोर्टमार्शलास जनरल कोर्टमार्शलाप्रमाणेंच अधिकार दिलेले आहेत, परंतु त्यांत व जनरल कोर्ट-मार्शलांत ह्या बाबतींत फरक आहे:—ह्या समरी जनरल कोर्टमार्शलमध्यें तीनपेक्षां कमी नाहींत इतके अमलदार असले ह्मणजे बस होतात; हे अमलदार, तें कोर्ट भरविणाऱ्या अमलदारास योग्य वाटेल त्याप्रमाणें ब्रिटिश अमलदार किंवा एतद्देशीय अमलदार असले तरी चालतात किंवा दोन्ही प्रकारचे असले तरी चालतात; हें कोर्टमार्शल, [इंग्लंडदेशाच्या] सैन्याबाबद आक्टाअन्वयेचें फील्ड जनरल कोर्टमार्शल ज्या रीतीनें भरण्यांत येतें व त्या रीतीनें भरलें तरी चालतें व तें फील्ड जनरल कोर्ट-मार्शल ज्याप्रमाणें पुरावा लिहून न घेतां आपल्या पुढचें काम लिहून ठेवितें त्या प्रमाणें ह्या समरी जनरल कोर्टमार्शलनें केलें तरी चालतें; मात्र भरविणारा अमलदार मुद्दाम सांगेल त्या बाबतींत ज्याप्रमाणें फील्ड जनरल कोर्टमार्शलास सगळा पुरावा व कैदी स्वपक्षसमर्थनार्थ सांगेल ती सगळी हकीकत लिहून घ्यावी लागते, त्याप्रमाणें भरविणारा अमलदार सांगेल त्या बाबतींत ह्या समरी जनरल कोर्टमार्शलांसही करावें लागतें; आणि ह्या समरी जनरल कोर्टमार्शलानें दिलेल्या शिक्षा डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलास देतां येतात त्यापेक्षां त्या जास्त नसतील तेव्हां, बाहालीशिवाय कायदेशीर ठरतात; परंतु त्या पेक्षां जास्त मोठ्या शिक्षा त्या कोर्टानें दिल्यास त्यांची तें कोर्ट भरविणाऱ्या अमलदाराकडून बाहाली व्हावी लागते.

११. ह्या मसुद्यांतलें समरी कोर्टमार्शल हें हल्लीच्या आईनांतल्या समरी कोर्टमार्शलाच्याच जोडीचें होय. हें कोर्टमार्शल हिंदुस्थानच्या लष्करी कायद्यांत मात्र आहे दुसरें कोठेंही आढळत नाहीं. तें, मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्करापैकीं कोणत्याही कोराच्या, डिपार्टमेंटाच्या किंवा डिटचाचमेंटच्या कमांडिंग अफिसरास (हा कमांडिंग आफिसर कांवटंट आफिसर असला पाहिजे) किंवा ज्या कोणत्याही ब्रिटिश कोरास अगर डिव्याचमेंटास एतद्देशीय कांवटंट डिटेल दिमतीस दिलेले असतील अशा कोराच्या किंवा डिव्याचमेंटाच्या कमांडिंग आफिसरास, भरतां येते. ह्या कोर्टांत कमांडिंग आफिसर व दुसरे दोन अमलदार असे तिघे असतात. हे जे दोन अमलदार असतात त्यांचें काम एवढेंच असतें कीं त्यांनीं त्या इन्साफाच्या कामाकडे लक्ष देऊन प्रोसीडिंगांवर सह्या कराव्या. ह्या कोर्टमार्शलचें साधारण काम ह्मटलें ह्मणजे, त्या कोर्टांत बसून इन्साफ करणाऱ्या अमलदाराच्या ताब्यांतील अमलदार, मेडिकल सबार्डिनेट, अमदार अगर वारंट आफिसर शिवाय करून इतर कोणत्याही मनुष्याचा इन्साफ करणें हें होय. तथापि सैन्याच्या हास्पिटल कोरांतल्या कोणत्याही असामीचा इन्साफ, तो डिस्ट्रिक्ट ताब्यांत असणाऱ्या अमलदारानें ह्या संबंधानें अधिकार दिलेल्या अमलदाराकडून, समरी कोर्टमार्शलानें करितां येतो. ज्यास लष्करी आईनांमध्यें शिक्षा सांगितलेली आहे अशा एकाद्या फारसा मोठा नसणाऱ्या गुन्ह्याचा इन्साफही, तो गुन्हा इन्साफ करणाऱ्या अमलदाराच्या विरुद्ध केलेला नसला तर, ह्याच कोर्टमार्शलानें करितां येतो; आणि इन्साफ तावडतोब झाला पाहिजे असें कांहीं कारण असेल तेव्हां अगर वरिष्ठ अधिकाऱ्याकडे इतल्ला करूं लागल्यास शिस्तीस बाध आल्याशिवाय तो करितां येणार नाहीं असा प्रसंग असेल तेव्हां ह्या कोर्टमार्शलास कोणताही गुन्ह्याचा इन्साफ करितां येतो. ह्या कोर्टमार्शलांत कोणत्याही कोराचा किंवा डिपार्टमेंटाचा ताबा असणारा अमलदार इन्साफ करित असेल तेव्हां त्याला मरणाची, काळेपाण्याची अगर एका वर्षापेक्षां जास्त कैदेची शिक्षा खेरीज करून कोणतीहि इतर शिक्षा देतां येते, परंतु एकाद्या डिव्याचमेंटचा ताबा असणारा अमलदार इन्साफ करित असेल तेव्हां त्याला साहा महिन्यांपेक्षां जास्त कैदेची शिक्षा देतां येत नाहीं.

समरी कोर्टमार्शलानें दिलेल्या शिक्षेस, ती देणारा अमलदार पांच वर्षांहून कमी नोकरीचा असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, बाहालीची जरूरी नाहीं ; परंतु सर्व खटल्यांचीं प्रोसीडिंग, विलंब लाविल्याशिवाय, कमांडर इन् चीफ किंवा इतर वरिष्ठ अमलदार ह्यांकडे पाठविलीं पाहिजेत ; आणि त्याला, योग्य वाटल्यास, त्या खटल्याच्या गुणदोषांकडे पाहून, तें इन्साफाचें काम रद्द करण्याचा अधिकार आहे, केवळ सांकेतिक कारणें लावून तसें करण्याचा अधिकार नाहीं.

१२. आईन ११७ अ ह्यांत, कोर्टमार्शलांस लागू असणारे जे हिंदुस्थानच्या पुराव्यांतील ठराव त्यांत, कोर्टमार्शलांपुरता फेरफार करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस दिलेला आहे.

१३. आईन १२०.—[इंग्लंड देशाचा] सैन्याबाबद आक्ट ह्यांतला ह्या आईनाशीं जुळता ठराव व ह्या आईनांतला ठराव ह्यांत फरक आहे. ह्या आईनांत, कोर्टमार्शलाचीं प्रोसीडिंग ज्या अमलदाराकडे बाहालीसाठीं पाठविण्यांत येतात त्याला असा अधिकार दिलेला आहे कीं, त्यानें तीं प्रोसीडिंग तपासणीसाठीं परत पाठवितांना, जरूर असल्यास आणखी पुरावा घेण्यास हुकूम करावा.

ह्या देशांत मोठ्या गांवापासून दूर असलेल्या ठाण्यांमध्यें इन्साफाच्या कामांत अनियमितपणा होण्याचा व कांहीं अवश्यक गोष्टी गळून जाण्याचा संभव असतो. अशा प्रसंगीं इन्साफाचें काम पुनः चालविण्याचा हुकूम करण्याच्या ऐवजीं सदहू प्रकारचा हुकूम करणें इष्ट दिसतें.

किरकोळ.

१४. आईन १३२.—[इंग्लंडदेशाचा] सैन्याबाबद आक्ट ह्यांतील तत्त्वांस अनुसरून, आतां, कोर्टमार्शलास, गैरसनदी अमलदाराचा दर्जा कमी करून त्यास कमी दर्जावर घालतां येईल; पूर्वीप्रमाणें त्यास शिपाई करून टाकण्याची जरूरी पडणार नाहीं. त्याचप्रमाणें, कोर्टमार्शलास, कांहीं बाबतींत दुहेरी शिक्षा देतां येईल : उदाहरणार्थ, बर्तर्फीची शिक्षा देऊन, शिवाय, ह्या आईनाअन्वयें देतां येण्या जोग्या इतर शिक्षां पैकीं एक शिक्षा देतां येईल.

१५. आईन १६१.—तीन महिन्यांपेक्षां कमी मुदतीची दिलेली सक्त मजुरीची शिक्षा साधी करावी एक, किंवा ती तशी बदलली नाहीं तर, कोणत्याही सिव्हिल तुरुंगांत कितीही थोड्या कालपर्यंत शिक्षा भोगून आलेल्या

मनुष्यास पलटणींत परत घेणें त्या पलटणीच्या हितास अपायकारक आहे अशी समजूत असल्यामुळें, त्या शिपायाचा गुन्हा तुलना करून पहातां अगदीं क्षुल्लक असतांही, त्याच्या नोकरीच्या फायद्यास सरकारानें मुकावें एक, हा असंबद्धपणा काढून टाकण्यासाठीं हा विशेष ठराव दाखल केला आहे.

१६. ज्या शिपायाविषयीं सिव्हिल अधिकाऱ्यांकडून पहिल्यानें शाबितीचा ठराव होऊन तो ठराव अपिलांत रद्द होईल, त्या शिपायाच्या बचावासाठीं जरूर असणारा ठराव आईन १९९ ह्यांत दाखल केला आहे.

शिवाय, मोहिमीवर असलेल्या ज्या कोणत्याही शिपायास काळेपाण्याची किंवा कैदेची शिक्षा देण्यांत येईल, त्यास कांहीं कालपर्यंत शिपायी ह्मणून राहूं देण्याविषयीं, आणि त्यास ह्याप्रमाणें जितक्या मुदतीपर्यंत राहूं दिलें जाईल तितकी मुदत त्याच्या काळेपाण्याच्या किंवा कैदेच्या मुदतीपैकीं गणण्याविषयीं ह्या आईनांत ठराव आहे.

१७. आईन १६१ अ ह्यांत, [इंग्लंड देशाचा] सैन्याबाबद आक्ट ह्यांतील ठरावांस सामान्यपणें अनुसरून, कोर्ट-मार्शलांचीं प्रोसीडिंग राखून ठेवण्यासाठीं आणि त्यांशीं संबंध असलेल्या मनुष्यांस तीं कशीं मिळावीं तें ठरविण्यासाठीं ठराव दाखल केले आहेत.

१८. आईन १६२.—ह्यांत दाखल केलेल्या फेरफारांवरून, कोर्ट आफ् इन्कैरी ह्यास, विन परवानगीची गैरहजिरी व तिची मुदत ठरवितां येऊन शिवाय, गैरहजर असलेल्या मनुष्याच्या स्वाधीन केलेल्या सरकारी मालांत कांहीं तूट असल्यास तिच्याबद्दल शपथेवर पुरावा घेतां येईल ; आणि त्या तुटीबद्दल दप्तरीं दाखल केलेला इकरार, तदनंतरच्या कोणत्याही इन्साफाच्या कामांत, त्या तुटीबद्दलचा अनुमानिक पुरावा समजला जाईल.

१९. आईन १६४.—ह्यांत, कोणत्याहि डिस्ट्रिक्टाची कमांड असणाऱ्या जनरल आफिसरास, कोणत्याहि गैरसनदी अमलदाराला इन्साफ केल्यावांचून खालच्या दर्जावर घालण्याचा अगर शिपायी करण्याचा अधिकार दिला आहे.

हा अधिकार आजपर्यंत दिलेला नसल्यामुळें मोठी अडचण वाटत आहे, आणि, हा अधिकार डिस्ट्रिक्टाची कमांड असणाऱ्या जनरल आफिसरास दिलेला असावा हें सर्वांस इष्ट वाटत आहे.

२०. आईन १७१ ते १७९.—ब्रिटिश इंडिया बाहेर किंवा ब्रिटिश इंडियांत मोहिमीच्या नोकरीवर असतांना केलेले सिव्हिल गुन्हे. ब्रिटिश इंडियाच्या हद्दींबाहेर नोकरी करितांना शिपायांनीं केलेल्या मोठाल्या सिव्हिल गुन्ह्यांचा इन्साफ करण्याच्या कामीं अनेक वेळां ज्या अडचणी अनुभवास आल्या आहेत, त्या ह्या आईनांच्या योगानें अगदीं दूर होतील.

सदर्हू प्रकारच्या गुन्ह्यांच्या संबंधानें फौजदारी कोर्टांस कोर्टमार्शलांबरोबर सामाइक हुकुमत दिलेली आहे. ह्या कामीं कधीं कधीं मतभेद होण्याचा संभव आहे, परंतु त्यापासून इन्साफाच्या कामीं कांहीं अडचण उत्पन्न होऊं नये ह्मणून असें टरविलें आहे कीं, ह्या दोन प्रकारच्या कोर्टांस सामाइक हुकुमत असेल तेव्हां, खटला कोणत्या कोर्टांपुढें चालवावयाचा तें पहिल्यानें लष्करी अधिकाऱ्यांनीं ठरवावें, परंतु, हुकुमत असणाऱ्या साधारण फौजदारी कोर्टाचा जर असा अभिप्राय असला कीं, तो खटला आपल्यापुढेंच चालला पाहिजे, तर, त्या कोर्टास, त्या खटल्याच्या संबंधानें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांकडे इतल्ला करण्यांत येऊन त्याचा निकाल होई तोंपर्यंत आपलें काम बंद ठेवण्याबद्दल लष्करी अधिकाऱ्यांस फर्मविण्याचा अधिकार आहे.

आईन १७३ हा अगदीं नवा आहे, परंतु आजपर्यंत जेव्हां जेव्हां वरिष्ठ अमलदाराशीं दांडगाई करण्यांत आली किंवा त्यास धमकी देण्यांत आली, तेव्हां तेव्हां हल्लीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें कांहीं बाबतींत जें कांहीं करण्यांत आलें आहे त्याला अनुसरूनच हा नवा आईन दाखल केला आहे.

ह्या आईनांत असें ठरविलें आहे कीं, लष्करी कायदा लागू असणाऱ्या कोणत्याहि मनुष्याच्यासंबंधानें, त्याशीं दांडगाई करणें किंवा त्यास धमकी देणें ह्यांसारखे विवक्षित मोठे गुन्हे करण्यांत आले असतां, ते ब्रिटिश इंडियांत करण्यांत आले असले तरी, त्यांचा इन्साफ कोर्टमार्शलाकडून करण्यांत येईल.

बहुतेक सगळ्या ब्रिटिश इंडियांमध्यें ब्रिटिश शिपाई, कोणत्याही सिव्हिल गुन्ह्याबद्दल कोर्टमार्शलाकडून इन्साफ केले जाण्यास पात्र आहेत.

परंतु एतद्देशीय शिपाई लष्करी गुन्ह्यांबद्दल मात्र कोर्ट मार्शलाकडून इन्साफ केले जाण्यास पात्र आहेत, आणि हिंदुस्थानच्या लष्करी आईनांमध्यें, त्या लष्करी गुन्ह्यांची व्याख्या करितांना, एकाद्या शिपायानें आपल्या वरिष्ठ अमलदारास ठार मारिलें असतां अगर त्यास मोठी दुखापत केली असतां जो गुन्हा होतो, त्याबद्दल स्पष्टरीतीनें ठराव केलेला नाहीं.

ह्मणून, कायद्याच्या शब्दांस धरून जर चाललें, तर, सदरहूप्रकारच्या गुन्ह्याच्या प्रसंगीं, त्या एतद्देशीय शिपायांस इन्साफासाठीं साधारण फौजदारी कोर्टाच्या स्वाधीन केलें पाहिजे. परंतु, अशा गुन्ह्याचा निकाल, शिस्तीकडे योग्य लक्ष दिलें जाऊन कोर्ट-मार्शलाकडून जलद होईल ह्मणून त्याचा इन्साफ त्या कोर्टाकडून होणें इष्ट आहे असें कधीं कधीं वाटतें, आणि त्याप्रमाणें त्याला "आपल्या वरिष्ठ अमलदाराच्या आंगावर चालून जाण्याबद्दल" कोर्ट-मार्शलाकडून इन्साफ करण्यांत येतो. ह्याप्रमाणें त्या मनुष्यावर आरोप ठेवणें हें कांहींसें गैरशिस्त आहे ही गोष्ट जरी खरी आहे, तरी, "आपल्या वरिष्ठ अमलदाराच्या आंगावर चालूण जाणें" ह्या गुन्ह्यास हल्लींच्या आईनांअन्वयें मरणापासून इतर सर्व खालच्या शिक्षा सांगितलेल्या असल्यामुळें सदरहू मनुष्याचा कोर्ट-मार्शलाकडून इन्साफ केल्यानें खरा न्याय होऊन लष्करी शिस्तीचें संरक्षण होतें ह्यांत संशय नाहीं. ज्या मनुष्याच्या हातून कदाचित खुनाचा गुन्हा घडलेला, त्या मनुष्याचा केवळ आंगावर चालून जाणें ह्या गुन्ह्याबद्दल इन्साफ करणें हें हल्लींच्या आईनांसारख्या कायद्याअन्वयें मात्र करतां येण्यासारखें आहे; कारण [इंग्लंड देशाच्या] सैन्याबाबद आक्टांत ज्याप्रमाणें वरिष्ठ अमलदाराच्या आंगावर चालून जाण्याच्या गुन्ह्याचा विचार करितांना तो अमलदार त्या गुन्ह्याच्यावेळेस आपल्या हुद्याच्या कामावर होता कीं नव्हता आणि तो गुन्हा मोहिमीवर करण्यांत आला किंवा क्यांटोन्मेंटांत करण्यांत आला ह्या महत्वाच्या गोष्टींचा विचार केलेला आहे, त्याप्रमाणें हल्लींच्या आईनांमध्यें विचार केलेला नसून वरिष्ठ अमलदाराच्या आंगावर चालून जाण्याच्या सर्व गुन्ह्यांस मरणाची शिक्षा सांगितलेली आहे; आतां ही गोष्ट सहज लक्षांत येण्याजोगी आहे कीं, ज्या मनुष्याच्या हातून कदाचित खून झालेला, त्याचा केवळ आंगावर चालून जाणें ह्या गुन्ह्याबद्दल इन्साफ होणें ह्या गोष्टीचा गैरशिस्तपणा क्षणभर एकीकडे ठेविला तरी, सदरहू प्रकारच्या महत्वाच्या गोष्टी ध्यानांत न आणणारा कायदा अमलांत ठेवणें मोठ्या अडचणीचें काम असलें पाहिजे.

ह्मणून, लष्करी अमलदारांविरुद्ध किंवा लष्करी कायदा लागू असणाऱ्या इतर मनुष्यांविरुद्ध करण्यांत आलेले विवाक्षित सिव्हिल गुन्हे केवळ साधारण फौजदारी कोर्टाकडून इन्साफ केले जाण्यास पात्र न ठेवितां ते, शिस्तीच्या कारणांसाठीं, कोर्टमार्शलाकडून इन्साफ केले जाण्यास पात्र करणें इष्ट आहे ही गोष्ट कबूल करून त्या गुन्ह्यांचा इन्साफ, ब्रिटिश शिपायानें केलेल्या सिव्हिल गुन्ह्यांप्रमाणेंच कोर्टमार्शलाकडून व्हावा असा ठराव ह्या मसुद्यांत दाखल केला आहे.

२१. हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सल ह्यांच्या अधिकाराअन्वयें हिंदुस्थानांत उभारलेल्या ज्या लष्कराविषयीं, तें मलिका मोआझमांच्या हिंदुस्थानांतील लष्कराचा एक भाग आहे किंवा नाहीं असा संशय असेल, त्या लष्करास ह्या मसुद्याअन्वयें सुधारलेल्या लष्करी आईनांतले सर्व किंवा कोणतेही ठराव लागू करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस शेवटच्या कलमावरून दिलेला आहे. देशी संस्थानांमध्यें गव्हर्नर जनरल ह्यांच्या एजंटांनीं मुख्यत्वेंकरून स्थानिक कारणांसाठीं ठेविलेल्या विवाक्षित फौजांस (ह्या फौजा आणि "इंपीरियल सर्व्हिस ट्रुप्स" ह्मणून प्रसिद्ध असलेल्या देशी संस्थानांच्या फौजा ह्यांचा कांहीं एक संबंध नाहीं) कोणत्याही प्रकारचा लश्करी कायदा लागू करण्याच्या संबंधानें कधीं कधीं ज्या अडचणी अनुभवास आल्या आहेत, त्या दूर करण्याच्या कामीं ह्या कलमाचा उपयोग होईल अशी आशा आहे.

(सही) हेन्‍री ब्राकेनबरी.

तारीख १३ आगष्ट १८९४.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.